(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

<u>नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत</u>

तालिका सभापती : आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. या चर्चेसाठी एक तासाचा वेळ आहे. तेव्हा आपण सर्वांनी मला सहकार्य करावे व या प्रस्तावावर महिलांना बोलण्याची जास्त संधी द्यावी.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, महिलांच्या विविध प्रश्नां संदर्भातील हा विषय आहे. या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. आपण ही चर्चा एका तासामध्ये पूर्ण करावयाचे म्हटले तर ते चटावरचे श्राध्द केल्यासारखे होईल. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, या चर्चेसाठी दोन ते अडीच तास द्यावेत. आपण ही चर्चा आज आणि उद्या अशा दोन दिवसांमध्ये पूर्ण करावी.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, महिलांच्या प्रश्ना संदर्भातील चर्चा एक तासामध्ये पूर्ण होणार नाही. तेव्हा आपण चर्चेसाठी कालावधी वाढवून द्यावा. तसेच महिलांच्या प्रश्नावर महिलां सदस्यांव्यतिरिक्त पुरुष सदस्यांना देखील बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये फास्ट ट्रॅक कोर्ट संदर्भातील उल्लेख आहे. तेव्हा सभागृहात विधि व न्याय विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित राहणे आवश्यक आहे. ते या ठिकाणी उपस्थित नाहीत.

तालिका सभापती : ठीक आहे. मी आपल्या मुद्याची नोंद घेतलेली आहे. संबंधित मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येईल. आता सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी प्रस्तावावरील भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : महिलांच्या सबलीकरणासाठी करावयाची उपाय योजना

मु.शी : महिलांच्या सबलीकरणासाठी करावयाची उपाय योजना या विषयावर श्रीमती अलका देसाई, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, निरंजन डावखरे, ॲड. जयदेव गायकवाड, प्रा.सुरेश नवले, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडते.

"भारतीय घटनेनुसार प्रत्येक महिला शासन, समाज, जात व कुटुंब या सर्व पातळीवर समान हक्कासाठी पात्र असूनही पाहिजे तसा फायदा महिलांना मिळत नसणे, पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात आज महिला काम करताना दिसत आहेत. कोणत्याही क्षेत्रात विशेष करुन शैक्षणिक क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे आढळून येणे, मात्र, स्त्री-भ्रूण हत्येने मुलींचे घटते प्रमाण हा एक फार चिंतेचा विषय असणे, तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचारात मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, समाजाकडून व कुटुंबाकडून महिलांना चांगली वागणूक व समानतेचा दर्जा मिळत नसणे, महिलांच्या संरक्षणार्थ व महिलांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी पोलीस विभागाची उदासीनता असणे, केंद्र शासनाने महिला अत्याचाराविरोधी लोकसभेत आणलेले विधेयक ही एक दूरगामी परिणाम करणारी घटना आहे, न्यायालयात महिला अत्याचाराविरोधी सर्व खटले फास्ट ट्रॅक वर घेऊन त्वरित निकाल मिळणे अत्यंत आवश्यक असणे, महिला वर्गामध्ये सुध्दा विधवा, परित्यक्त्या व पीडित वर्गातील महिलांकडे तसेच मोलमजुरी करणाऱ्या महिलांकडे विशेष लक्ष देऊन करावयाच्या उपाययोजना, यासाठी महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी व स्त्री हक्कांची अंमलबजावणी अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी आणि महिलांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

सभापती महोदय, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला एक पोलादी राज्य घटना दिली. या पोलादी घटनेच्या आधारावर आपल्या देशाचे त्या त्या विषयातील कामकाज यशस्वीपणे चालू आहे. आपल्या देशाबरोबर आणखी काही देश स्वतंत्र झाले. परंतु त्या देशांना सुध्दा इतकी मजबूत राज्य घटना बनविता आली नाही. ते देश आज बंडाळीच्या मार्गावर आहेत. परंतु आजही भारत देश घटनेच्या आधारावर मजबूतपणे काम करीत आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी दोन-तीन गोष्टींची आठवण करुन देते. पहिली गोष्ट म्हणजे या देशाला आणि आम्हा महिलांना स्व.इंदिरा गांधी यांचे कणखर नेतृत्व मिळाले. श्रीमती सुषमा स्वराज यांच्या सारखे बहुआयामी व्यक्तिमत्व मिळाले. दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती शीला दीक्षित, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री श्रीमती मायावती या महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. परंतु श्रीमती सोनिया गांधी यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अलका देसाई....

ही गोष्ट महाराष्ट्राच्या पुरुष प्रधान संस्कृतीला मान्य करावयास पाहिजे. राज्यात पुरुष प्रधानतेने काम चालत आहे. परंतु माननीय सोनिया गांधी यांनी एक पाऊल पुढे टाकले. त्यांनी सर्व मंडळींची दारे ठोठावली. आपल्याला माहीत आहे की, डिसेंबर महिन्यात दिल्लीमध्ये एक अघटीत घटना घडली होती. त्यानंतर मी माननीय सोनियाजींच्या भेटीची वेळ घेऊन त्यांच्याशी दोन मिनिटे चर्चा केली. त्या वेळी त्या खूप व्यथित होत्या. अशा घटनांवर आळा घालण्यासाठी व आवश्यक ते प्रयत्न करण्यासाठी त्यांनी सर्वांची दारे ठोठावून त्यांच्यात एकमत घडवून आणले. या बाबतीत आपल्याला कोठे तरी सुधारणा करावयास पाहिजे असा त्यांचा प्रयत्न होता. देशाचे माननीय पंतप्रधान सुध्दा माननीय सोनियाजींच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिले. मुलीच्या संमतीने लैंगिक संबंध ठेवण्याच्या वयाची मर्यादा 18 वर्षांवरुन 16 वर्षे करु नये या बाबत त्यांनी सर्वांचे एकमत घडवून आणले. कारण महिलेलाच महिलेचे दु:ख समजते. पुरुषांनी कितीही वरपांगी दाखविले तरी पुरुष मंडळी स्त्रियांचे दु:ख समजू शकत नाही, असे माझे प्रामाणिक मत आहे.

महोदय, मला एकदा एका नेत्याने विचारले होते की, तुम्ही इतक्या कणखरपणे कशा वावरता ? मग या सुधारणेचा शेवट कोठे आहे ? मी त्या नेत्याला उत्तर दिले होते की, या सर्व घटना आपला उंबरठा ओलांडून घरात येत नाहीत. यावर सभागृहाचे काय मत आहे माहीत नाही. परंतु अशा घटना आपला उंबरठा ओलांडत नाहीत असे माझे मत आहे. माननीय सोनियाजींनी कणखरपणे काल ते विधेयक पास करुन घेतले आणि सर्व राजकीय पक्षांना एकमतावर आणले. लोकसभेत ते विधेयक संमत झाले आहे. आज ते विधेयक राज्यसभेत जाईल आणि त्या ठिकाणी सुध्दा ते संमत होईल असा मला विश्वास आहे.

महोदय, आपला देश स्वतंत्र झाला आहे, देशातील जनता स्वतंत्र झाली आहे. त्या त्या फरकाने त्या त्या राज्यातील संस्कृतीप्रमाणे मुली शिकू लागल्या आहेत. आज सर्वच क्षेत्रात मुली शिकत आहेत, पुढे जात आहेत. कल्पना चावला ही आपल्या देशातील मुलगी आहे. तिने अंतराळावर झेप घेतली. इतके विज्ञान आज पुढे आहे. सबंध देशाने, जगाने तिचे कौतुक केले. पण ती आज आपल्यात नाही. आज विज्ञान वेगाने पुढे जात आहे. आपल्याला काही आजार आहे काय, आपल्या शरीरातील व्याधी सोनोग्राफीमध्ये पाहता येईल काय, त्यावर उपाय करता येईल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अलका देसाई....

काय इ. अनेक कारणांसाठी आपण विज्ञानाचा उपयोग करावयास लागलो. परंतु आपल्या राज्यातील काही नतद्रष्ट डॉक्टर विज्ञानाचा दुरुपयोग करु लागले. माझ्या कुटुंबात सुध्दा मुंबई विद्यापीठाची महिला गायनाकॉलॉजिस्ट आहे. महोदय, काही जण विज्ञानाचा उपयोग चांगल्यासाठी न करता स्त्रीच्या शरीरात कोणता गर्भ वाढत आहे याच्या परीक्षणासाठी डॉक्टरांकडे जाऊ लागले. मुलीचा गर्भ असल्यास तो मारुन टाकण्यापर्यंत विज्ञानाचा दुरुपयोग होऊ लागला. त्यातूनच बीड जिल्ह्यात डॉ.मुंडे, डॉ.सरस्वती मुंडे जन्माला येतात आणि सर्व स्त्री जातीला काळिमा लावतात असे चित्र तुम्हाला-आम्हाला आणि महाराष्ट्राला पहावयास मिळाले. येथपर्यंत येऊन हे थांबले काय ? नाही. म्हणून आता कायद्याची चौकट घट्ट करण्याची वेळ आली आहे.

महोदय, आज कॉर्पोरेट क्षेत्रात भगिनी वावरत आहेत. बँकेमध्ये त्या काम करीत आहेत, कंपनीच्या व्यवस्थापनाचे काम त्या चांगल्याप्रकारे करताना दिसत आहेत. निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मुली खरोखरच सुरक्षित आहेत असे आपल्याला वाटते काय ?

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

आज स्त्री सुरक्षित दिसत नाहीत. माननीय श्रीमती प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती असताना मी त्यांच्याकडे गेले होते. मी त्यांच्याशी या विषयावर बोलले. श्रीमती प्रतिभाताई पाटील महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या अध्यक्षा असताना मी त्यांच्या हाताखाली काम केले आहे. मला लगेचच प्रेसकडे वगैरे जाण्यास आवडत नाही. मी त्यांना म्हटले की, ताई, हे काय चालले आहे ? श्रीमती प्रतिभाताई मला म्हणाल्या की, तू म्हणतेस ते खरे आहे. त्यांनी सुध्दा आम्हाला यामध्ये मदत केली.

सभापती महोदय, स्त्री भ्रूणहत्या हा आजचा एक परवलीचा शब्द झालेला आहे. स्त्री भ्रूणहत्येच्या बाबतीत आम्ही आरडाओरड करतो, आम्ही बोलतो, आम्ही सांगतो परंतु त्यातून काही निष्पन्न होताना दिसत नाही. सभापती महोदय, आपण माननीय सभापतींच्या खुर्चीत बसला आहात. आपण यावर ठोस निर्णय घ्यावा असे मला आपल्याला सुचवावयाचे आहे. या राज्यामध्ये बलात्काराचे प्रमाण वाढले आहे. परवा तीन मुलींवर बलात्कार झाला किंवा अत्याचार झाला. या राज्यामध्ये दर पाच मिनिटाचा एक गुन्हा घडतो आणि एखाद्याच गुन्ह्याचा निकाल लागतो आणि त्यांना शिक्षा होते. हे कशाचे द्योतक आहे ? आपली न्याय व्यवस्था चांगली काम करीत नाही का, न्याय व्यवस्थेमध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे का ? ते देखील करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महिलांचे सक्षमीकरण, महिलांचे सबलीकरण असे मोठमोठे शब्द आम्ही या ठिकाणी वाचतो तसेच वर्तमानपत्रांमध्ये वाचतो. परंतु खऱ्या अर्थाने जिच्या मनगटामध्ये ताकद आहे तीच सक्षम झालेली आहे. मी आपल्याला एक उदाहरण सांगते. मी मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेविका होते. आता आपण निवडून आलो की तिस-या मिनिटाला गाडी मिळते. मंत्री महोदया प्रा. वर्षा गायकवाड माझ्या शेजारच्या इमारतीमध्ये राहतात. त्यांना ही घटना माहीत असेल. त्यावेळी आपण चार वेळा नगरसेविका म्हणून निवडून आलात तरी गाडी मिळण्याची शाश्वती नव्हती.

आमचे नेते श्री. कामत यांच्या नेतृत्वाखाली मी काम करते आणि त्यांच्याचप्रमाणे वागणे याचाही मला आनंद आहे. मी त्यावेळी बसने स्टेशनला जात होते. स्टँडींग कमिटीची बैठक होती. त्यावेळी एक माता आपल्या सुनेबरोबर बसमध्ये बसली. तिला अंधेरी स्टेशनला जावयाचे होते. परवाच्या एका भाषणात सुध्दा मी हे सांगितले. स्त्रीवर अत्याचार होतो म्हणजे काय हे मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

माहीत नाही. त्या बसवर बोर्ड वेगळा होता. त्या महिला त्या कॉलनीमध्ये नवीन होत्या. त्यांना अंधेरी स्टेशनला जावयाचे होते. त्यांच्याबरोबर सुनबाई होत्या आणि दोन नातवंडे होती. त्यांनी अंधेरी रेल्वे स्टेशनचे तिकीट मागितले. कंडक्टर पुढे गेला आणि नंतर परत दुसऱ्यांना तिकीट देण्यासाठी मागे आला आणि त्या महिलेला खाली उतरा, खाली उतरा असे म्हणाला. अंधेरी स्टेशन येण्यास एकच स्टॉप शिल्लक होता. तो त्या महिलेला पटकन बोलला की, जर तुम्हाला बसचा नंबर कळत नाही तर स्वत:चा नवरा कसा ओळखता ? त्याचा तो शब्द तापलेल्या तेलाप्रमाणे माझ्या कानात गेला. मी त्या कंडक्टरचा शर्ट पकडून त्यांच्या कानाखाली आवाज काढला. मी नगरसेविका आहे, माझे काय व्हायचे ते होऊ दे. नुसते स्त्रियांच्या प्रश्नावर बोलणे वेगळे आणि रिॲक्ट होणे वेगळे आहे. मी रिॲक्ट झाले. त्यावेळी माझ्या मुलीची फर्स्ट एमबीबीएसची परीक्षा होती. मुंबई शहरातील सर्व बसेस बंद झाल्या होत्या. शिवसेनेचे मला माहीत नाही पण मी स्त्रीवर झालेल्या अपमानाच्या विरुध्द आवाज काढला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

आणि अलका देसाईच हे काम करु शकते, बाकीची मंडळी असे करु शकणार नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना आलेल्या अनुभवाबाबत व त्यांनी ज्या पध्दतीने प्रतिक्रिया व्यक्त केली त्याबाबत मी त्यांना सलाम करते. परंतु आम्ही या सभागृहात फुकट आलो नाहीत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याबरोबर मी काम केलेले आहे. ज्यावेळी स्त्रियांवर अत्याचार, अन्याय होईल त्यावेळी त्याला प्रखर विरोध करुनच स्त्रिया पुढे जाणार आहेत. पण जाऊ दे, तिच्यावर अन्याय झाला आहे, मला काय करायचे आहे असे म्हणून चालणार नाही. अन्याय व अत्याचारासाठी सर्व महिलांनी एकत्र आले पाहिजे. एकत्र येऊन या प्रश्नाचा निर्णय लावला पाहिजे.

सभापती महोदय, गेल्या आठवड्यात दि.8 व 9 मार्च, 2013 रोजी दिल्ली येथे लोकसभेच्या माननीय अध्यक्षा यांनी देशातील सर्व पक्षातील महिला नेत्यांची कॉन्फरन्स बोलविली होती. त्या कॉन्फरन्सला पुरुष नेते मंडळींना आमंत्रण दिलेले नव्हते. या कॉन्फरन्सचे सूत्रसंचालन श्रीमती सुमित्रा महाजन यांनी केले होते. श्रीमती सुमित्रा महाजन ह्या आपल्या महाराष्ट्राच्या माहेरवाशीणच आहेत. त्या कॉन्फरन्समध्ये मी तीन महत्वाचे मुद्दे मांडले होते. पहिला मुद्दा असा मांडला होता की, देशामध्ये महिलांकरिता फास्ट ट्रॅक कोर्ट लवकरात लवकर करावेत. दुसरा मुद्दा असा मांडला होता की, आज अनेक वस्तूंची जाहिरात करण्यासाठी महिलांच्या चित्राचा वापर केला जातो. ते बंद करण्यात यावे आणि तिसरा मुद्दा असा मांडला होता की, सेन्सॉर बोर्डावर केंद्र सरकारने अंकुश ठेवून चित्रपटामध्ये व अनेक मालिकांमधून असभ्य चित्रीकरण दाखविले जाते ते बंद करण्यात यावे. मला सांगण्यास आनंद होत आहे की, माननीय केंद्रीय वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्यात आली होती. त्या समितीने हे तिन्हे मुद्दे कव्हर केलेले आहेत. त्यामुळे महिला काय चीज आहे हे त्यावरुन दिसून आलेले आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यापासूनच माणूस जन्माला आला. त्यानंतर आम्ही येथपर्यंत येऊन पोहोचलो. हे देखील सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्रीमती अलका देसाई.....

सभापती महोदय, या राज्यासाठी, या शहरासाठी फास्ट्र ट्रॅक कोर्टाची स्थापना केली जाणार आहे की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. ते जर झाले नाही तर आपण केवळ या विषयाची औपचारिकता पार पाडतो असा संदेश समाजामध्ये जाईल एवढेच मी या निमित्ताने मी सांगते आणि माझे दोन शब्द संपविते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्त्रियांच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. त्याबद्दल मी प्रथम त्यांचे अभिनंदन करते. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, भारतीय राज्य घटनेनुसार प्रत्येक शासन, समाज, जात व कुटुंब या सर्व पातळीवर समान हक्क व अधिकार असूनही महिलांना संपूर्ण अधिकार मिळालेला आहे का असा मला प्रश्न पडलेला आहे. महिलांना आजही समाजात दुय्यम स्थान आहे. शासनाने 1994 व 2001 असे दोन वेळा महिला धोरण जाहीर केलेले आहे. या महिला धोरणात अंतर्भूत असलेल्या योजना पूर्णत्वास का जाऊ शकल्या नाहीत ? आर्थिक अडचणीमुळे त्या योजना पूर्ण करता आल्या नाहीत, पुरुषांचा सहभाग मिळाला नाही म्हणून ते धोरण राबविता आले नाही ही खरी कारणे आहेत. आजही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते शिवाय मुलगा, मुलगी असा भेदभाव केला जात असल्यामुळे महिलांच्या विकासामध्ये मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

दारिद्र्य रेषेखालील महिला, अपंग महिला, विधवा, परितक्त्या, आर्थिकद्ष्टया दुर्बल घटकातील महिला यांसाठी भारत सरकारने जागतिक पातळीवर जेण्डर बजेटिंगवर सही केलेली आहे. हे जेण्डर बजेट महिलांसाठी सर्वदृष्टीने फायद्याचे आहे. माझी विनंती आहे की महिलांना सर्व पातळीवर समानता द्यावयाची असेल आणि ती राज्याच्या सर्व विभागामध्ये प्रतिबिंबीत करावयाची असेल तर जेण्डर बजेटिंग करणे आवश्यक आहे. म्हणून जेण्डर बजेटिंगसाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करावेत. महिलांना आर्थिक संधी उपलब्ध होण्यासाठी, महिलांना सक्षम करण्यासाठी, त्यांची शैक्षणिक योग्यता वाढविण्यासाठी, त्यांचे आरोग्य वृद्धिंगत करण्यासाठी या जेंण्डर बजेटिंगचा फादा होणार आहे.

आज असे म्हटले जाते की महिला ह्या शैक्षणिक दृष्टया खूप पुढे गेलेल्या आहेत. परंतु माझे मत वेगळे आहे. महिला शैक्षणिकदृष्ट्या पुढे गेलेल्या आहेत असे जे म्हटले जाते त्यावर माझा विश्वास नाही. या संदर्भात मी अभ्यास केल्यानंतर माझ्या असे लक्षत आले की, केवेळ पहिली ते 10वी पर्यन्त शिक्षण घेणा-या मुलींच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. मुलींना 14 वर्षापर्यन्त म्हणजे 8वी पर्यंतचे शिक्षण अनिवार्य केलेले आहे. नंतर 12वी पर्यन्त मोफत शिक्षण ठेवलेले आहे. याचा फायदा असा झालेला आहे की 64 टक्के मुली पहिली ते दहावीपर्यन्त शिकत आहेत. त्यानंतर मुलींचे शिकण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. दहावीनंतर अकरावी-बारावीपर्यन्त शिकणा-या मुलींचे प्रमाण 20 टक्के आहे. हे मुलींचे प्रमाण 20 टक्क्यापर्यंत का आहे याचा कुणी विचार केलेला नाही. महिला कोणत्याही गोष्टीला सक्षमतेने सामारे जाऊ शकेल असे पदवीपर्यन्तचे शिक्षण घेणा-या महिलांचे प्रमाण केवळ 3 टक्के आहे. 3 टक्के महिला स्वत:च्या पायावर सक्षमतेने उभ्या राहू शकतात तर 97 टक्के महिला अनेक गोष्टींपासून वंचित राहतात. त्यामुळे महिलांचा शैक्षणिकदृष्ट्या विकास झाला असे म्हणता येणार नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आपण महिलांसाठी 12वी पर्यन्तचे शिक्षण मोफत केलेले आहे, येथपर्यंतच न थांबता महिलांन पदवीपर्यन्तचे शिक्षण मोफत केले तर मोठ्या प्रमाणावर महिला आपल्या पायावर सक्षमतेने उभ्या राहू शकतील. त्यांना पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, महिलांच्या आरोग्याचा प्रश्न फार मोठा आहे. या देशाची सदृढ पिढी स्त्री घडवित असते.स्त्रीच्या आरोग्याचा विचार केला तर देशाची पिढी घडवित असताना तिच्या शक्तीचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

ऱ्हास होत असतो. म्हणून तिचे आरोग्य चांगले रहावे याकडे विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज आहे. जागतिकस्तरावर 34 देशाचा सर्व्हे करण्यात आला. त्यामध्ये असे लक्षात आले की, स्त्रीच्या आरोग्याच्या बाबतीत आपला भारत देश हा 128व्या क्रमांकावर आहे. मग ग्रामीण भागातील स्त्रीचे आरोग्यासंबंधीचे चित्र काय असेल याचाही विचार करण्याची गरज आहे. जोपर्यन्त स्त्री सुदृढ राहाणार नाही तोपर्यंत ती चांगली पिढी घडवू शकणार नाही. राज्यामध्ये दवाखाने भरपूर आहेत. दवाखान्याच्या बाबतीत कुठेही बॅकलॉग नाही. परंतु मी सांगू इच्छिते की, केवळ इमारती बांधून आरोग्य सुदृढ रहात नाही. दवाखान्यांच्या इमारतीमध्ये डॉक्टर्स पाहिजेत, औषधे पाहिजेत, विशेषता महिला डॉक्टर्स पाहिजेत. आज ग्रामीण भागामध्ये महिला डॉक्टर नाहीत. माझी विनंती आहे की, आपण महिलांना दुय्यम स्थान देऊ नका. महिलांच्या भरवशावर राज्याचा आणि देशाचा डोलारा उभा आहे. कोणत्याही गोष्टीला सामोरे जाण्याची क्षमता महिलांमध्ये निर्माण करावयाची असेल तर त्यांचे आरोग्य सुदृढ असले पाहिजे. त्यासाठी चांगल्या दवाखान्याची व्यवस्था असली पाहिजे, स्त्रीच्या बाळंतपणाची चांगली व्यवस्था असली पाहिजे. या सर्व गोष्टी कागदोपत्री केलेल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात या गोष्टींचा उपयोग होताना दिसत नाही. देशाची एक सशक्त आणि सुदृढ पिढी निर्माण करण्यासाठी स्त्रीच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. महिलाना चांगले आरोग्य मिळाले पाहिजे, सकस आहार मिळाला पाहिजे यासाठी जेण्डर बजेटिंगची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात बोलत असताना महाराष्ट्र सगळयात जास्त सुरक्षित आहे असे म्हटले जाते. काल मी या सदनामध्ये सांगितले की, बलात्काराच्या केसेससंबंधी डीएनएने एक रिपोर्ट सादर केला. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, 2011 मध्ये 1701 बलात्काराच्या केसेस झाल्या. त्यातील 221 म्हणजे 38 टक्के केसेस या फक्त मुंबईच्या आहेत. कोणत्याही मुलीवर बलात्कार होऊन तिचे आयुष्य उद्ध्वस्त होणे, तिचा मृत्यू होणे ही गोष्ट राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला कलंक आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

महोदय, आपण हिशोब करतो की, महाराष्ट्रात गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे. महाराष्ट्रापेक्षा मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे असे सांगितले जाते. आपल्याला स्पर्धा करावयाची असेल हे प्रमाण ज्या राज्यात कमी आहे, त्यांच्यांशी स्पर्धा केली पाहिजे. अशा प्रकारची स्पर्धा ही वर बघून नव्हे तर खाली बघून करण्यात येते. या राज्यात 2010 या वर्षात 1599 एवढी बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत. त्यात 10 वर्षाखालील 108 मुलींवर झालेल्या बलात्काराच्या केसेस आहेत. 10 ते 18 वयोगटातील मुलींवर झालेल्या बलात्काराच्या केसेस 659 एवढया आहेत.

2011 मध्ये 10 वर्षाखालील मुलींवर झालेल्या बलात्काराच्या केसेस 136 आहेत. 10 ते 18 वयोगटातील मुलींवर झालेल्या बलात्काराच्या 709 केसेस आहेत. 37 टक्के केसेस बलात्काराच्या आहेत. बलात्काराच्या प्रकरणासंबंधी कोर्टाचे निकालाचे प्रमाण 5.4 टक्के आणि 7.6 टक्के एवढे आहे. बलात्कार करणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे सदरहू गुन्हयांचे गुन्हेगार राज्यामध्ये मोठया प्रमाणात वाढत असल्यामुळे हे गुन्हेगारीचे राज्य आहे की काय अशी भीती वाटावयास लागली आहे.

सभापती महोदय, मी एका गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख करु इच्छिते. या राज्यात मोठया गर्वाने सांगितले जाते की, हुंडाबळीच्या केसेस कमी झालेल्या आहेत. 2009 मध्ये हुंडाबळीच्या रजिस्टर केसेस 341 झालेल्या आहेत. 2010 मध्ये 393 आणि 2011 या वर्षामध्ये 339 केसेस हुंडाबळीच्या झालेल्या आहेत. 2011 मध्ये हुंडाबळीच्या चार्जशीट दाखल झालेल्या केसेस 259 आहेत. केवळ 33 प्रकरणी कोर्टाकडून निकाल दिले गेलेले आहेत व या प्रकरणी गुन्हेगारांना शिक्षा झालेली आहे. या प्रकरणांच्या बाबतीत निकाल लागण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. या बाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, महिलांचा राजकीय सहभाग हा फार महत्वाचा आहे. या सभागृहात वाढत्या गुन्हयांच्या बाबतीत नेहमी चर्चा करीत असतो. राजकीय दृष्टीने महिलांचा सहभाग असणे अत्यावश्यक आहे. जनगणनेमध्ये 50 टक्के महिलांची नोंद आहे. तरी सुध्दा देशाच्या जडणघडणीमध्ये महिलेचा हिस्सा असणे गरजेचे असून सुध्दा महिलेचा स्वीकार अद्याप केला गेलेला नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

दिले. परंतु राज्याच्या संदर्भात महत्वाचे जे निर्णय घेतले जातात, राज्याची जी धोरणे ठरतात, जे कायदे ठरविले जातात, त्यात महिलांचा हिस्सा नगण्य आहे. महिलांना सदरचा हिस्सा कधी दिला जाणार आहे. आम्ही संसदेत जाऊ, विधानसभेत जाऊ, पुरुषांच्या बरोबरीने जाऊ , तुम्ही महिलांना 50 टक्के आरक्षण देऊ नका, पण कमीत कमी 33 टक्के तरी आरक्षण आपण देवू शकता. महिलांना दिलेले आरक्षण अडकलेले आहे, त्याचे कारण असे आहे की, हा देश पुरुष प्रधान आहे. या देशात पुरुषांचे वर्चस्व आहे. म्हणून महिलांना काही द्यावयाचे नाही, त्यांना घरी दुय्यम स्थान, बाहेर दुय्यम स्थान यामुळे आम्हाला 33 टक्के आरक्षण पूर्णपणे मिळत नाही.

सभापती महोदय, आम्ही या विषयाच्या अनुषंगाने माननीय श्रीमती सोनिया गांधी यांना भेटावयास गेलो. त्यांनी सुध्दा सांगितले की, महिलांना आरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. देशाचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांना भेटावयास गेलो, त्यांनी आम्हाला सांगितले की, ते केले पाहिजे. सर्व मान्यवरांनी आम्हाला होकार दिला आहे. मात्र घोडे कुठे पेंड खात आहे हे आम्हाला माहिती नाही. परंतु या संदर्भात कोणीच एकत्र येण्यास तयार नाही. कोणीच या कायद्याचा सन्मान करण्यास तयार नाहीत असे मला एकंदरीत दिसून येते.

सभापती महोदय, महिला सक्षमीकरणाचा विषय महिला बचत गटाच्या मोठया प्रमाणात होत आहे. महिला आर्थिकदृष्टया सक्षम नसतील तर त्या समाजामध्ये कोणत्याही गोष्टीला सामोरे जाऊ शकत नाहीत. या राज्यात 3.50 लाख महिला बचत गट निर्माण करण्यात आलेले आहेत. या 3.50 लाख महिला बचत गटामध्ये 30 हजार एवढेच महिला बचत गट हे सक्षम आहेत. याचे कारण असे आहे की, महिला बचत गटांना कर्ज देण्यामध्ये मोठया प्रमाणात शासनाकडून भेदभाव करण्यात आला आहे. बीपीएल मध्ये 50 टक्के अनुदान देता, 1 रुपया जरी उत्पन्नात वाढ झाली तर त्यांना एपीएलमध्ये टाकून काहीही लाभ दिला जात नाही. त्यामुळे राज्यातील मोठया प्रमाणात महिला बचत गट बंद पडलेले आहेत. महिलांना कायदेशीर संरक्षण असणे आवश्यक आहे.

महोदय, महिला लग्न होऊन सासरी जाते, तिचे सर्वस्वी पती असतो. तिचे लग्न झाल्यानंतर त्या महिलेला पतीच्या मालमत्तेतील एकही पैसा हिस्सा म्हणून मिळत नाही. मुलीचे लग्न झाल्यानंतर लागलीच पतीच्या मालमत्तेतील 50 टक्के हिस्सा तिच्या नावे नोंद व्हावा. जेणे करुन

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

तिला असे वाटावे की, मी या घरात सुरक्षित आहे. माझा पती मला व्यवस्थित वागवेल. घटस्फोट झाल्यानंतर लाथ मारुन हाकलून दिले तर त्या महिलेला भिकाऱ्या शिवाय दुसरी जागा राहत नाही, म्हणून हा कायदा होण्याची आवश्यकता आहे. धन्यवाद.

यानंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्राला पराक्रमी स्त्रियांची परंपरा लाभलेली आहे. शिव छत्रपतींना घडविणाऱ्या जिजामाता, झाशीची राणी, तारा राणी, अहिल्यादेवी होळकर, क्रांतीवीर सावित्रीबाई फुले अशा अनेक थोर महिलांची नावे घेता येतील. अशा पराक्रमी महिलांची परंपरा आजपर्यंत चालत आलेली आहे, याचा मला सार्थ अभिमान वाटतो. ज्योतिबा फुले, आगरकर, कर्वे, महात्मा गांधी यांच्या बरोबरीने स्वातंत्र्य लढ्यामध्ये महिलांनी प्रचंड योगदान दिलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्याही समाजातील स्त्रीला सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे, समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे यासाठी अनेक प्रयत्न केले. भारतीय संविधानाने त्यांना मूलभूत हक्क आणि अधिकार दिले. दुर्बल घटकातील कष्टकरी स्त्रियांसाठी विशेष कायद्याची तरतूद केली. अनेक वर्षे स्त्रियांचे काही वेगळे प्रश्न आहेत त्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने प्रथम आंतरराष्ट्रीय महिला दिन जाहीर केला. दरवर्षी एखाद्या सणाप्रमाणे आम्ही आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करतो. त्या चळवळीतून एक प्रकारे समाजाचे प्रबोधन करीत असतो. स्त्रियांवरील अत्याचारात वाढ झाली आहे का? हा प्रश्न आजही कायम आहे. हा वादाचा विषय होऊ शकतो. आपण अनेक प्रकारच्या चर्चा ऐकतो.

सभापती महोदय, आज प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक मीडिया सशक्त झालेला आहे. इलेक्ट्रॉनिक मीडिया घराघरात पोहोचला आहे. जगामध्ये कुठेही एखादी महत्वाची घटना घडली तर तिचे पडसाद घरातील दिवाणखान्यात बसून आपल्याला अनुभवता येतात. एखादी गोष्ट घडल्यानंतर स्त्रियांची बदनामी होते. तिच्या अब्रूचे धिंडवडे निघतात. एखाद्या महिलेवर अत्याचार झाल्यास पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे हे पूर्वी स्त्रियांना अशक्य वाटत होते. ज्या महिलांवर अत्याचार होतात त्या कणखरपणे उभ्या राहतात आणि स्वत:च्या कुटुंबाची पर्वा न करता आरोपींना शिक्षा व्हावी या भावनेने पोलिसांकडे जाऊन तक्रार करतात. अशा महिलांना न्याय मिळाला का? पोलीस स्टेशनवर तक्रार दाखल करण्यास गेल्यानंतर तेथे प्रश्नांची सरबत्ती सुरु होते. त्या प्रश्नांना कशाप्रकारे उत्तरे द्यायची, वकिलांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तरे कशी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

द्यायची, न्यायालयातील प्रश्नांची उत्तरे कशी द्यायची या संदर्भात महिला असहाय्य ठरतात. वर्षानुवर्षे न्यायालयात प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे घटनेची तीव्रता 2-4 वर्षानंतर कमी होते. त्या विषयीचा संताप आणि चीड निघून जाते. किती जणांना शिक्षा होते हा एक संशोधनाचा विषय आहे.

आज अनेक महिलांवर अत्याचार होतात, त्यापैकी 10 ते 15 टक्के प्रकरणामध्ये गुन्हे दाखल होतात. गुन्हा दाखल झाल्यानंतर न्याय प्रक्रियेमध्ये विलंब होत असल्यामुळे अनेक वर्षे खटल्याचा निकाल लागत नाही. भवरीदेवी प्रकरणाचा उदाहरण म्हणून दाखला देता येईल. 20 ते 22 वर्षे होऊनही तिला न्याय मिळालेला नाही. कोर्टाकडून असा प्रश्न विचारला जातो की, दलित महिलांवर सवर्ण लोक अत्याचार करु शकतात का? पोलीस यंत्रणा आणि न्यायपालिका यांच्यावर सुध्दा आज महिलांचा विश्वास राहिलेला नाही.

सभापती महोदय, मानसिक आणि शारिरीक छळ झाल्यानंतर एवढे बळ एकवटून कशासाठी खटपट करायची असे काही महिलांना वाटू लागले आहे. दिल्लीतील निर्भया प्रकरणाने संपूर्ण देश ढवळून निघाला. 18 डिसेंबर, 2012 रोजी रात्री दिल्ली येथे घटना घडली. मोठ्या कष्टाने आणि अडचणीतून मार्ग काढत डॉक्टरीचे शिक्षण पूर्ण केलेल्या तरुणीवर झालेल्या सामुहिक बलात्कारामुळे तिच्या वडिलांचे, भावाचे आणि आईचे स्वप्न एका क्षणात भंग झाले. ती बस तिने पकडली, त्या बसमध्ये तिच्यावर पाशवी नराधमांनी अमानुष अत्याचार केले. ही दुर्दैवी घटना घडल्यानंतर संपूर्ण देश ढवळून निघाला. तरुण मुले-मुली रस्त्यावर एकत्र आले. मुलींनी सांगितले, आता आम्ही अत्याचार सहन करणार नाही. सगळा देश एका आवाजात ओरडला. या घटनेचा निषेध करण्यासाठी जम्मू- काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या शाळांमधील मुली रस्त्यावर उतरल्या.

नंतर एच.1...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

मला सांगण्यासा आंनद वाटतो की, या गोष्टीतून एकच चांगले झाले की, दिल्लीमध्ये अतिशय कडक थंडी असतांना सुध्दा त्या थंडीमध्ये तरुण मुले-मुली रस्त्यावर उतरली, त्यांना कोणत्याही राजकीय पक्षाने पाठिंबा दिलेला नसतांना सुध्दा तरुण मुले रस्त्यावर उतरली होती. स्वातंत्र्यांच्या 65 वर्षानंतर एवढे मोठे आंदोलन आपल्या देशाने पाहिले नव्हते. परंतु दिल्लीतील घटनेमुळे सर्व महिला संघटना, सर्व तरुण मुले-मुली रस्त्यावर उतरली आणि स्वयंस्फूर्तीने त्यांनी आंदोलन केले. आता आम्ही हे सहन करणार नाही, बलात्काऱ्यांना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे असे त्यांनी ठणकावून सांगितले. यासंदर्भात मीडियाने सुध्दा ही बातमी घराघरात पोहचवली. या घटनेतील दुर्दैवी डॉक्टर तरुणीच्या संदर्भात प्रत्येक घराघरात असे वाटत होते की, ती आपल्यातीलच एक होती. या दामिनीचे काय झाले, या निर्भयाचे काय झाले ? असे प्रश्न अनेक घराघरातील लोक विचारु लागले. या अमानुष घटनेला पोलिसांनी गांभीर्याने घेतले नाही, जवळच्या खाजगी रुग्णालयात या मुलीला ॲडमिट करण्यात आले नसल्यामुळे तिला योग्य ट्रिटमेंट मिळू शकली नाही. अशा घटनांमध्ये संबंधित महिलेला दोन तीन तासांच्या आत वैद्यकीय मदत मिळणे आवश्यक असते परंतु तशी वैद्यकीय सुविधा आपल्याकडे मिळत नाही. अशा घटनांमध्ये दोन तीन तासात वैद्यकीय मदत मिळाली तर त्यातून जे पुरावे मिळतात ते पुरावे कोर्टात ग्राहय घरले जातात व संबंधित आरोपीनां शिक्षा होऊ शकते. परंतु यासंदर्भात आपण कमी पडत आहोत असे मला वाटते. अशा घटनांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा होण्याची आवश्यकता असून त्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या प्रसंगाचे गांभीर्य समस्त स्त्री वर्गाला समजल्यामुळे महिला आता दबकून वागत नाही महिलांची एकजूट झाल्यामुळे त्यांना असे वाटू लागले आहे की, माझ्यावर अत्याचार झाला असला तरी त्यातील आरोपी सुटता कामा नये. त्यामुळे अशा प्रकारे महिला पुढे येऊन बोलू लागल्या आहेत. या प्रकरणामध्ये मला एकच सांगावेसे वाटते की, आपण माध्यमांमध्ये चर्चा ऐकतो त्यामध्ये शासन, प्रशासन, पोलीस यंत्रणा यांना जबाबदार धरुन टिकेचे लक्ष्य केले जाते. या यंत्रणेत दोष नाही असे मी म्हणणार नाही तर या सगळयांमध्ये दोष आहेत. त्यांनी स्वत:चे कार्य सुधारण्याचे तसेच पुरावे गोळा करण्याचे महत्वाचे काम केलेच पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

मला असे वाटते की, 65 वर्षापूर्वी आपल्या देशाची लोकसंख्या 36 कोटी होती परंतु आज आपल्या देशाची लोकसंख्या 120 कोटी झालेली आहे. आपल्या महाराष्ट्राची लोकसंख्या सुध्दा 11 कोटीच्या वर गेलेली आहे, गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे.

सभापती महोदय, घराघरांमध्ये पोहचलेल्या टीव्हीमध्ये अश्लिल सिनेमा, सिरियल्स आणि गाणी दाखवली जातात त्यामुळे लहान मुलांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झालेली आहे. आपला तरुण वर्ग आता विकृतीकडे जातो आहे. आपण नेहमी म्हणतो की, समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. परंतु समाजाची मानसिकता कशी बदलली जाईल, त्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन, पक्षाच्या पलिकडे जाऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. महिलांनी एकत्र येऊन अत्याचार रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती सुप्रियाताई सुळे यांनी जागर जाणिवांचा कार्यक्रम आयोजित केला होता. नायगाव ते पुण्याच्या फुले वाडयांपर्यंत लाँग मार्च केला होता. हे अंतर 60 कि.मीटरचे होते व या कार्यक्रमामध्ये 800 तरुणी व महिलांनी पदयात्रा काढून "जागर जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा" कार्यक्रम केला होता.याधून त्यांनी स्त्रीभ्रूण हत्या, हुंडा विरोधी तसेच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांच्या विषयात समाजाची मानसिकता बदलण्याचे काम केले आहे. तरुण मुलींना एकत्र करुन संघटीत केले तर आपल्यावरील अत्याचार रोखू शकतो असे बळ देण्याचे काम आमच्या पक्षाने केलेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्रीमती विद्या चव्हाण....

आम्हाला नावे ठेवण्यापेक्षा चांगली कामे वेगवेगळ्या संघटनांतर्फे कशी राबविता येतील हे पहावे. तसेच महिलांना चांगले बळ कसे देता येईल हे देखील बघितले पाहिजे. माननीय मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी परवाच तिसरे महिला धोरण जाहीर केले आहे. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले आहेत. यात आपण अनेक महिला संघटनांना एकत्रित केलेले आहे. प्रशासन आणि शासनाने मिळून महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी एकत्रितपणे येऊन सामना केला पाहिजे. तसे केले तरच पोलीस यंत्रणेला आपण बळ देऊ शकतो. त्यासाठी चांगले प्रयत्न सर्वांनी केले पाहिजेत. आजही महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले तर हे चित्र निश्चितपणे बदलू शकतो, एवढी आशा मी बाळगते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, हा प्रस्ताव ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे त्या सर्वांचे मी आभार मानते. तसेच, या प्रस्तावावर मला बोलण्यासाठी आमच्या पक्षाचे गट नेते तसेच, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचेही आभार मानते.

जेव्हा कुठल्याही पुरूषाचा सत्कार होतो तेव्हा व्यासपीठावरून बोलले जाते की, प्रत्येक पुरूषाच्या यशाच्या पाठीमागे स्त्री असते, त्याची पत्नी असते. महिलांचे प्रश्न यशस्वी व्हायचे असतील तर त्यासाठी पुरूषांचे सहकार्य अत्यावश्यक आहे म्हणूनच मला सांगावयाचे आहे की, महिला व बाल विकास विभाग यशस्वी व्हायचा असेल तर अन्य विभागाच्या लोकांनी, माननीय मंत्र्यांनी, सचिवांनी हा प्रश्न महिला व बाल विकास विभागाचा आहे असे न मानता सामूहिक जबाबदारी मानली तरच हा विभाग यशस्वी होणार आहे. याकडे मला सभागृहाचे लक्ष वेधायचे आहे.

विनोदाने काही जण बोलतात की, हे मंत्री चांगले काम करीत नाही म्हणून त्यांच्याकडे सामाजिक न्याय किंवा महिला व बाल कल्याण विभाग सोपवावा. आमचे तर असे म्हणणे आहे की, जी व्यक्ती सक्षम आहे त्यांच्याकडे महिला व बाल कल्याण विभाग असला पाहिजे. परंतु, समाजामध्ये हा फार मोठा दुजाभाव आहे.

वेळ अभावी मी ठोस मुद्यांकडे येणार आहे. त्यानंतर काही प्रश्नांकडे वळते. विधी व न्याय विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसले तरी मी येथे तीन मागण्या करीत आहे. त्याच्या नोटस घेतल्या तर बरे होईल. नाही तर येरे माझ्या मागल्या होईल. धुळे येथे सन 2013 मध्ये केस झाली आहे. त्याचा एफआयआर माननीय मंत्र्यांकडे संदर्भासाठी पाठवित आहे. ही केस मुलींच्या अनैतिक व्यापारा संबंधातील आहे. त्यातील पीडित मुलीने लक्ष वेधलेले आहे. त्यासंबंधी आजच्या वृत्तपत्रात देखील बातम्या आलेल्या आहेत. या मुलींना कोंडून ठेवायचे. त्यांना कुत्रे त्रास द्यायचे. धुळ्यातील एक पत्रकार व राजकीय व्यक्ती यांच्यासह या मध्ये 15 ते 16 जण सामील होते. त्यांची नावे देण्यात आली आहेत. त्याचा ट्रेस बऱ्याच वर पर्यंत आलेला आहे. या प्रकरणातील सरकारी वकिलांनी ही केस चांगली लढविली नाही, अशी सामाजिक संघटनांची तक्रार आहे. त्यामुळे ॲड.निर्मलकुमार सूर्यवंशी यांची नियुक्ती व्हावी अशी तेथील पोलीस अधीक्षकांनी देखील सरकारला विनंती केली आहे. त्याकडे देखील मी लक्ष वेधते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

औरंगाबादच्या मोक्का कोर्टामध्ये केस सुरू आहे. बीड येथे एका महिला अधिकाऱ्यावर बलात्कार झाल्याची केस सुरू आहे. फेब्रुवारी 2010 मधील ही केस आहे. त्यामध्ये ॲड.विनिता वर्तक चांगल्या काम करीत आहेत. पण आरोपीचे वकील तारखा घेऊन विलंब करीत आहेत. त्यामुळे संबंधित पीडित महिलेला त्रास होत आहे. त्याकडेही मी लक्ष वेधते. या प्रकरणात देखील विधी व न्याय विभागाने सहकार्य करणे गरजेचे आहे. बीड मध्ये सरकारी वकील म्हणून ॲड.जंजीरे यांची नियुक्ती व्हावी अशी देखील मी मागणी करते.

सन 2001 मध्ये केंद्र शासनाने महिला धोरण जाहीर केले. त्याआधी आपण सन 1994 मध्ये महिला धोरण जाहीर केले होते. त्यामध्ये जेंडर बजेटचा उल्लेख होता. आज राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. राज्य महिला धोरणामध्ये जाहीर करून सुद्धा गेल्या अकरा वर्षामध्ये अर्थसंकल्पामध्ये जेंडर बजेट का करण्यात आले नाही ? याचे उत्तर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांबरोबरच समाजात नेतृत्व करणारे जे जे लोक आहेत त्यांनी सुद्धा दिले पाहिजे.

माननीय मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांनी खूप कष्ट व परिश्रम घेऊन सर्वांसमोर महिला धोरण आणले आहे. त्यासाठी मी समाधान व्यक्त करते. या महिला धोरणा संबंधी दोन्ही सभागृहात चर्चा व्हावी अशी सूचना मी या निमित्ताने करते. या चर्चेसाठी दोन दिवसाचा वेळ सभागृहामध्ये देण्यात यावा अशी देखील विनंती करते.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

महिलांसोबत पुरुष वर्गाच्या ज्या काही भावना आहेत त्या त्यांनी मांडाव्यात. अनेक पुरुषांच्या मनात महिलां विषयी तिरस्काराच्या भावना आहेत. काही जण मला सांगतात की, महिला खूप दुरुपयोग करीत आहेत. जेथे दुरुपयोग होत आहे तो आपण कायद्याच्या कलमान्वये रोखू शकतो. पण कोणी व्यक्तीकेंद्रीत तेचे समर्थन करीत नाही हे मला येथे सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, महिला उद्योजकांना प्लॉटस देण्यात येतील असे महिला धोरणामध्ये जाहीर करण्यात आले होते. हे धोरण जाहीर झाल्यानंतर किती इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये महिला उद्योजकांनी प्लॉटसची मागणी केली, त्यापैकी किती जणांना प्लॉटस मिळाले, किती ठिकाणी त्याचा चांगला उपयोग झाला या संदर्भात चेम्बर ऑफ कॉमर्सशी बोलावे. या संदर्भात नाशिक येथील महिला उद्योजकांनी त्यांच्या प्रयत्नांच्या पाठीशी शासनाने उभे रहावे अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केलेली आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधते.

सभापती महोदय, या ठिकाणी महिलांवरील अत्याचार आणि त्यांच्या पुनर्वसनासंबंधी मुद्दे मांडण्यात आले. हे प्रश्न खरे तर विधि व न्याय विभाग आणि गृह विभागाशी संबंधित आहेत. पण महिला गृह आणि बाल सुधार गृह हे महिला व बाल विकास विभागाशी संबंधित आहेत. या गृहांच्या सुधारणा करण्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने ताशेरे मारलेले आहेत. आधार गृहांमधून मुली पळून जात आहेत. या संदर्भात श्रीमती आशा वाजपेयी यांची समिती नेमलेली आहे. त्या समितीने ही आधार व बाल गृहे सरकारने चालविणे चांगले राहील असे सुचविले आहे. त्यासाठी पदांची आणि निधीची तरतूद वित्त विभागाने केली पाहिजे.

सभापती महोदय, आंध्र प्रदेशमध्ये को-मॅनेजमेंट पध्दत आहे. यासाठी एखादी सामाजिक संस्था आणि आपल्या विभागाचे अधिकारी यांनी एकत्र बसून चर्चा केल्याशिवाय मार्ग निघेल असे मला वाटत नाही, याकडे मी शासनाचे लक्ष वेधते.

सभापती महोदय, राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष पद आजही रिक्त आहे. या संदर्भात आम्ही कितीतरी वेळा मागणी केलेली आहे आणखी किती वेळा मागणी करायची ? मी माननीय मंत्री महोदया प्रा.वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची मागणी करणार नाही. कारण तो त्यांच्या अखत्यारितील विषय नाही. राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष पद इतके दिवस का प्रलंबित ठेवण्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आले या प्रश्नाचे उत्तर माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी दिले पाहिजे. राज्य महिला आयोग दुर्बल करण्याचे कारस्थान मागील दहा वर्षापासून सुरु आहे. या आयोगाचा निधी 2 कोटी रुपयांवरुन 55 लाखांवर आणलेला आहे. तेथील पदे रिक्त आहेत. बाल आयोग अध्यक्षाचे पद देखील रिक्त आहे.

सभापती महोदय, माझी मागणी आहे की, सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्डसारखे महाराष्ट्रामध्ये सोशल वेल्फेअर बोर्ड करावे. अशा प्रकारचे बोर्ड पूर्वी होते. परंतु ते अजून मजबूत केले पाहिजे. ज्या संस्थांनी कमीत कमी 15 वर्षे काम केलेले आहे त्यांना इन्स्टीटयुशनल सपोर्ट दिला पाहिजे. काही संस्था चुकीचे काम असतील हे मी मान्य करते,परंतु अनेक चांगल्या काम करणाऱ्या संस्था आहेत. त्या संस्थांना निधी आणि इतर मदत मिळत नसल्यामुळे खिळखिळ्या झालेल्या आहेत. आज आपणास ॲन्टी ट्रॅफिकींगच्या प्रकरणातील मुलींना कोठे ठेवायचे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. कारण आपणास चांगली संस्था सापडत नाही. ज्या अधिकृत संस्था आहेत आणि ज्यांचे काम व्यवस्थित सुरु आहे अशा संस्थांची संख्या कमी होत चालली आहे. तेव्हा चांगल्या काम करीत असलेल्या संस्थाना इन्स्टीटयुशनल सपोर्ट देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाचा "लोकशाही दिनाचा" उपक्रम अतिशय चांगला आहे. या संदर्भात माझी सूचना आहे की, महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री महोदयांनी प्रत्येक विभागीय स्तरावर तीन महिन्यातून एका "लोकशाही दिनाला" उपस्थित रहावे आणि तेथील आमदार, महापौर, सामाजिक संस्था, महापौर,जिल्हापरिषद अध्यक्ष यांना बोलाविल्यास त्या ठिकाणी तक्रारी घेऊन येणाऱ्या महिलांच्या तक्रारींचा पाठपुरावा करण्यासाठी उपयोग होईल असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करते.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी महिलांच्या विविध प्रश्ना संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात महिलांच्या प्रश्ना संदर्भात चर्चा होत नाही. परंतु चर्चा होऊनही त्यावर निर्णय काय होतात हा महत्वाचा प्रश्न आहे. भारतीय घटनेने स्त्री-पुरुषांना बरोबरीचे स्थान दिलेले आहे. तरी सुध्दा महिलांना सन्मानाची वागणूक दिली जात नाही.

सभापती महोदय, राज्यात होत असलेली स्त्री-भ्रूण हत्या हा फार गंभीर विषय आहे. आज प्रत्येकाला पत्नी पाहिजे, परंतु घरात मुलगी नको असते. मुलगी शेजारच्या घरात जन्माला यावी अशी इच्छा असते. हा एक ज्वलंत प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात महिला व बाल विकास विभाग काम करीत आहे. माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांचे मी मनापासून अभिनंदन करते. कारण त्यांनी महिला धोरणाचा मसुदा पुणे येथे जाहीर केलेला आहे.

. सभापती महोदय, सन 1994 मध्ये माननीय श्री.शरद पवार यांनी प्रथम महिला धोरण जाहीर केले.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यानंतर 2001 मध्ये स्व.विलासराव देशमुख यांनी जाहीर केले आणि आता तिसऱ्यांदा महिला धोरण जाहीर होत आहे. महिला धोरण करण्याचे काम सुरु असताना अनेक संस्थांनी एकत्र येऊन काही सूचना केलेल्या आहेत. महिला धोरणामध्ये त्या सूचनांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. महिलांवर बलात्कार, अत्याचार झाल्यानंतर आपण नेहमी मागणी करतो की, या घटनांवर आळा घालण्यासाठी नवीन कायदा केला पाहिजे. मी सांगू इच्छिते की, आपल्याकडे खूप कडक कायदे आहेत. परंतु त्या कायद्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. त्यामुळे इतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

महोदय, पुरुषांच्या बरोबर महिला सुध्दा प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही की, ज्या क्षेत्रात महिला मागे आहेत. आमच्या नेत्या माननीय श्रीमती सोनियाजी गांधी आणि स्व.राजीव गांधी यांचा मला या निमित्ताने उल्लेख करावयास पाहिजे. त्यांनी महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 33 टक्के आरक्षण दिले. त्यानंतर 50 टक्के आरक्षण दिले आहे. लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षणाचा मुद्दा संसदेत प्रलंबित आहे. मला खात्री आहे की, आघाडी सरकारच्या माध्यमातून लोकसभा आणि विधानसभेत महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचे काम होईल. महिलांना सन्मानाची वागणूक देण्याची इच्छा असेल तर केवळ राजकीय क्षेत्रातच आरक्षण देऊन चालणार नाही तर इतरही क्षेत्रात आरक्षण दिले पाहिजे.

महोदय, हुंडाबळी, बलात्कार, अन्याय, अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर महिलांना लवकर न्याय मिळत नाही. भंडारा जिल्ह्यातील घटनेबाबत काल सभागृहात चर्चा झाली. एक महिना होऊन सुध्दा त्या प्रकरणातील आरोपी मोकाट आहेत. या निमित्ताने माझी मागणी आहे की, अशा घटनांमध्ये पोलिसांनी संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे.

महोदय, केंद्र सरकारने संसदेमध्ये महिला अत्याचार विरोधी विधेयक लोकसभेत सादर केले आहे. ते विधेयक दूरगामी परिणाम करणारे ठरणार आहे. मला निश्चितपणे सर्व पक्षांचे अभिनंदन करावयास पाहिजे. कारण सर्व पक्ष एकत्र येऊन ते एकमताने पास करीत आहेत.

महोदय, इतर प्रश्नांबरोबरच महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. अशाच घटना घडत राहिल्या तर महिला कायदा हातात घेण्यास मागे पुढे पाहणार नाहीत. महिला चाकू आणि मिरची पूड हातात घेऊन फिरतील. ही वेळ येऊ द्यायची नसेल तर पोलिसांनी सक्षमपणे काम करावयास पाहिजे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिप्ती चवधरी....

महोदय, या ठिकाणी अनेकांनी जेंडर बजेटचा विषय मांडला. हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य सरकारकडून अनेक प्रकल्प हाती घेतले जातात. परंतु ते प्रकल्प करीत असताना महिलांचा विचार कोठेही होत नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. महिला सुधारगृह, महिला कारागृह, महिला वसतिगृह इ. ठिकाणी अपुऱ्या सुविधा असतात. त्या ठिकाणी जेवण किंवा राहण्याची व्यवस्था असली तरी त्या अपुऱ्या असतात. या ठिकाणी 100 महिलांची क्षमता असेल तर तेथे 200-250 महिलांना अक्षरश: डांबलेले असते असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. हा प्रश्न देखील अतिशय महत्त्वाचा आहे.

महोदय, ज्यावेळी नातेवाईक आजारी असतात त्यावेळी महिलांना रुग्णालयात राहण्याची वेळ येते. अशा वेळी त्यांच्यासाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था नसते. अशा परिस्थितीत महिला सुरक्षित कशा राहतील ? या निमित्ताने माझी मागणी आहे की, अशा महिलांसाठी राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली पाहिजे.

महोदय, आज महिला पोलीस पुरुषांबरोबर काम करीत आहेत. परंतु त्यांच्या स्वतंत्र विश्रांतीगृह किंवा स्वच्छतागृहाचा विचार केला जात नाही. महोदय, आज राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. माझी मागणी आहे की, या वर्षीच्या अर्थसंकल्पात जेंडर बजेचा विचार झाला पाहिजे. प्रत्येक प्रकल्पामध्ये महिलांचा विचार झाला पाहिजे, किंबहुना त्यांचा सहभाग असला पाहिजे. जो प्रकल्प केला जाणार आहे त्याचा वापर महिला सुध्दा करणार आहेत हे डोळ्यासमोर ठेवून विचार केला पाहिजे. महोदय, महिलांना निरनिराळ्या कामानिमित्त घराबाहेर पडावे लागते. महिला ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणी कधी कधी त्यांना तेथील पुरुष अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाचे बळी पडावे लागते. अशा घटनांमध्ये कठोर शिक्षा करण्यासाठी कडक कायदा करण्याची आवश्यकता आहे. शिवाय जे कायदे अस्तित्वात आहेत त्यांची अंमलबजावणी चांगल्याप्रकारे व्हावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

अशुद्धीत पत्र / शुद्धीसाठी नाही

नंतर श्री.बरवड...

श्रीमती दिप्ती चवधरी .....

स्त्रिया 50 टक्के असून सुध्दा कोणत्याही गोष्टीमध्ये त्यांना हवे तसे सहभागी करुन घेता येत नाही हे मला या ठिकाणी अवश्य सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, मी शेवटी एवढेच सांगेन की, महिला बचत गटाची चळवळ सुध्दा फार मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली आहे. जोपर्यंत महिला आर्थिक दृष्ट्या स्वत:च्या पायावर उभ्या राहात नाहीत तोपर्यंत हे जे सर्व प्रश्न आहेत त्या बाबतीत त्या निर्णय घेऊ शकणार नाहीत. मला या ठिकाणी एक छोटेसे उदाहरण द्यावेसे वाटते. ज्या महिलांनी कधी गावची वेस सुध्दा कधी ओलांडली नाही अशा महिलांना आम्ही बचत गटाच्या मार्फत मॉरिशस देशामध्ये घेऊन गेलो आणि त्या ठिकाणी पुनवडी जत्रेचे आयोजन केले. मॉरिशस शासन आणि आमच्या संस्थेचा जो सामंजस्य करार झालेला आहे त्या अंतर्गत गेली चार वर्षे सतत आम्ही त्या देशात जात आहोत आणि तेथील पंतप्रधानांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होते. ज्या महिलांनी कधी गावची वेस सुध्दा ओलांडली नाही त्या महिला त्या ठिकाणी जाऊन प्रदर्शन भरवितात आणि स्वत:च्या वस्तूंची विक्री करतात. त्या महिलांमध्ये जो आत्मविश्वास आलेला आहे तो अतिशय महत्वाचा आहे.

सभापती महोदय, आपल्याला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झालेली आहेत. आपल्याला स्वराज्य मिळाले आहे पण महात्मा फुले यांच्या स्वप्नातील जो भारत आहे ते स्वराज्य आपल्याला मिळावयाचे असेल तर ज्याला आपण सुराज्य म्हणतो तो दिवस तेव्हा असेल जेव्हा रात्री 7 वाजल्यानंतर सुध्दा महिला एकटी बाहेर पडेल तेव्हा. त्यामुळे सुरक्षितता अतिशय महत्वाची आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(काही सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी परवानगी मागतात)

उप सभापती : आता 11.00 वाजत आलेले आहेत.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, मला फक्त काही सूचना करावयाच्या आहेत. या चर्चेमध्ये एकही पुरुष सदस्य बोलला नाही हे चित्र बरोबर वाटणार नाही.

उप सभापती : ही चर्चा वाढवावयाची असेल तर माझी तयारी आहे.

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनामध्ये सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. मी दोन दोन वाक्यांमध्ये फक्त सूचना करणार आहे. या प्रस्तावामध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे त्यामध्ये महिलांना रोजगार मिळण्याच्या संधीबाबतचा सुध्दा उल्लेख करावा त्याचबरोबर शासनाने त्याबद्दलचे धोरण ठरवावे. याची दोन कारणे आहेत. मुंबई महापालिकेने मोठ्या प्रमाणात पे अँड पार्कच्या रिझर्वेशनच्या जागा महिलांना दिल्या पाहिजेत असा निर्णय घेतला. शासनाने जर त्याबद्दलचे निर्देश महानगरपालिकांना दिले तर महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळेल.

सभापती महोदय, राज्य सरकारच्या उद्योग खात्याने महिला संस्थांसाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शिलाईचे मोठे टेंडर काढले त्यामध्ये मोठमोठ्या 26 महिला संस्था सहभागी झाल्या. पण दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, कलावती महिला मंडळ आणि जगदंबा महिला मंडळ या केवळ राजकीय ईन्फ्ल्युएन्स असणाऱ्या संस्थांना 100 कोटी रुपयांचे काम मिळाले. अन्य 16 संस्थांना काम मिळाले नाही. त्यांना ते काम मिळावे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, आपण महिलांसाठी 50 टक्के आरक्षण मागतो. 50 टक्के राजकीय आरक्षणामध्ये ज्या जागा आरक्षित होतील त्या कमीतकमी दहा वर्षासाठी ठेवाव्यात जेणेकरुन महिलांना त्या ठिकाणी संधी मिळू शकते.

सभापती महोदय, निर्भयाच्या प्रकरणाबाबत आपण सर्व बोललो. पण त्या निर्भयाच्या प्रकरणामध्ये अजून निकाल आलेला नाही पण त्या प्रकरणाच्या संदर्भात त्याचे बिभत्स दर्शन दाखवून आपला टीआरपी वाढविण्याचे काम सोनी टी.व्ही. करीत आहे. शासनाने त्यांना निर्देश द्यावेत की, क्राईम पेट्रोल या कार्यक्रमामध्ये निर्भयाचा एपिसोड आपल्या टीआरपीसाठी दाखवू नका निर्णय लागेपर्यंत थांबावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

सभापती महोदय, फॅमिली कोर्ट या महिला आणि पुरुषांच्या संदर्भातील कौटुंबिक विषयाचा उल्लेख यामध्ये केला आहे आणि तो महत्वाचा आहे. फॅमिली कोर्टामध्ये अजूनही 40 टक्के सरकारी वकील भरलेले नाहीत. 30 टक्के जज्जेस भरलेले नाहीत आणि कौन्सिलिंगसाठी 45 टक्के कौन्सिलर्स अजून सुध्दा त्या ठिकाणी उपलब्ध नाहीत अशी स्थिती आहे. शासनाने याबाबत धोरणात्मक उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, जस्टीस वर्मा यांनी आपल्याला एक शिफारस केली आहे आणि त्यामध्ये असे म्हटले आहे की, एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेट सीआरपीसी सेक्शन 21 खाली पोलिसांनी स्थानिक स्तरावर करणे आवश्यक आहे ज्यातून महिलांचे पार्टिसिपेशन रोजगार आणि प्रोटेक्शनमध्ये वाढेल. त्या बाबतीत सुध्दा शासनाने भूमिका घ्यावी अशी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या चर्चेसाठी एक तासाची वेळ निश्चित केली होती. हा विषय महत्वाचा व गंभीर असल्यामुळे साहजिकच प्राधान्याने सभागृहाच्या महिला सदस्यांना हा ठराव मांडण्याची व त्यावर बोलण्याची पहिली संधी आपण दिली आहे. हे प्रथम मला निदर्शनास आणावयाचे आहे. ते आवश्यकच होते, तसे होणे गरजेचे होते. परंतु या विषयाचा आवाका पाहिला तर यातील बारीक सारीक गोष्टींमध्ये जाण्यासाठी आपण नियोजित केलेला वेळ अतिशय अपुरा आहे असे मला वाटते. या विषयाबाबत व्यापक स्तरावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

या चर्चेत सहभागी होत असताना मी सुरुवातीला सांगू इच्छितो की, आपल्याच सभागृहामध्ये मी चारही बाजूला नजर टाकली असताना सहज विचार केला की, या राज्याला मोठा इतिहास आहे. या राज्यात कितीतरी कर्तृत्वान महिला होत्या पण ज्या राष्ट्रीय नेत्यांची छायाचित्रे या सभागृहात आहेत त्यामध्ये एकाही महिला नेत्यांचे छायाचित्र लावलेले नाही हे असे का घडते ? याचाही विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. या राज्याचा कारभार मंत्रालयाच्या जुन्या सचिवालयाच्या इमारतीतून होतो. ही इमारत ज्या रस्त्यावर उभी आहे त्या रस्त्याचे नाव मादाम कामा रोड असे आहे. स्वातंत्र्य लढ्यातील एका महिलेचे नाव त्या रस्त्याला ठेवलेले आहे. पण आपण तसे वागत आहोत काय ? असा प्रश्न मला पडतो.

याच प्रस्तावामध्ये महिला व बालकल्याण खात्याचा देखील समावेश आलेला आहे. मला वाटते की, या खात्याच्या नामाभिधानासाठी काहीतरी अधिकचा विचार केला पाहिजे. महिला व बाल असे त्याचे नाव आहे. त्यामुळे पुरुषांची जबाबदारी आपोआप बाजूला होते. महिलांचा हा जो विषय आहे त्यात निसर्गदत्त आईपण आहे. ही महिला सुरुवातीला माता असते, पत्नी असते, सासू असते या सगळया भूमिका करीत असताना बाल मात्र तिच्या बरोबर जोडलेला असतो. म्हणजे जो पुरुष आहे त्याने तिच्यापासून लांब गेले तरी चालेल अशा संस्कृतीची मांडणी गेल्या कित्येक शतकापासून झालेली आपण पाहत आहोत. यामध्ये बदल केला आहे काय ?

1960 पासून आतापर्यंत जे काही घडत आहे त्या वास्तवाचे भान शासनाच्या धोरणामध्ये

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

कधी येऊ शकते याचा विचार एक सामाजिक शस्त्र म्हणून आपण केला आहे काय ? मी याचा विचार करतो त्यावेळी मी सहजच साहित्य, कला, संस्कृती या माध्यमांकडे जातो. मग 1960 सालापासून प्रत्येक दशकातील नाटकांमध्ये काय विषय आले होते ? सहजच सुचले म्हणून सखाराम बाईंडर, पुरुष, घाशिराम कोतवाल या नाटकांची नावे घ्यावीशी वाटतात आणि आजच्या स्त्रियांच्या वास्तवाचे दर्शन घडविणाऱ्या मायलेकी या नाटकाचेही नाव घ्यावेसे वाटते. स्त्रियांचे हे सर्व प्रश्न गेल्या 50-60 वर्षामध्ये एक वेगळे रुप धारण करुन आपल्यासमोर आलेले आहेत. ज्या घटना होतात, ज्यांची पोलिसांकडे नोंद केली जाते. त्याचे प्रमाण किती आहे. सामाजिक व कौटुंबिक दबावामुळे जे अत्याचार होतात त्याची नोंदच कोठेही झालेली नाही. अशा नोंद न झालेल्या गुन्ह्यांची संख्या कित्येक पटींनी वाढलेली आहे असे मला वाटते. दबलेल्या समाजातील स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल, समाजामध्ये जे काही घडत आहे त्यासंबंधी वारंवार या सभागृहात चर्चा होत असते. दलित महिलेच्या अत्याचारामध्ये वाढ होत असेल तर त्यासाठी कायदा व सुव्यवस्था कमी पडते का आणि कायदा व सुव्यवस्थेच्या पलीकडे सामाजिक भान व सामाजिक मन पुढील काळात कसे बदलले पाहिजे यादृष्टीने आपण विचार कधी केला आहे का ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

समाज किती पुढे जात आहे याचा आपण विचार करीत असताना लिव्ह इन रिलेशनच्या टप्प्यावर समाज येऊन ठेपलेला आहे. स्त्री-पुरुष समानता मानल्यानंतर अशा प्रकारे एकत्र राहाणे सुध्दा समाज मान्य करण्याच्या भूमिकेवर येत आहे. याची कारणे काय असू शकतील यासंबंधीचा आपण मागोवा घेतो त्यावेळी पूर्वापार चालत आलेली परंपरा, म्हणजे मुलींना आवश्यक तेवढे शिक्षण द्यावे, त्या फार शिकल्या नाहीत तरी चालतील, त्यांना घरकाम करता आले म्हणजे झाले, म्हणजे लग्नाच्या ठिकाणी जाताना त्यांची जी क्वालिफिकेशन्स आहेत त्यामध्ये त्या शैक्षणिकदृष्टया किती पुढे गेलेल्या आहेत यापेक्षा गृहकृत्यदक्ष असे वर्णन करताना तुला गाता येते का असा प्रश्न त्या काळी विचारला जात होता. तिला गाणे येत असले तरी ते समारंभापुरते म्हणून दाखवयाचे आणि नंतर आयुष्यभर ते तिने विसरायचे. म्हणजे तिची क्षमता, तिच्या अंगी असलेले कलागुण, तिचे शिक्षण या सगळया गोष्टी तिला कुठे तरी एका लग्न बंधनात अडकल्या नंतर कायमच्या बंद करुन टाकयच्या, अशा पध्दतीची ही जी रचना आहे. या रचनेकडे आपण कुठल्या दृष्टीने बघणार आहोत हे शोधले पाहिजे. पूर्वीच्या काळची परंपरा आज देखील किती आहे हे मला माहीत नाही.

आपण जुन्या काळातली पुस्तके, कांदब-या वाचतो त्यावरुन लक्षात येते की, त्यावेळी अशी परंपरा होती की, नवरा-बायकोने रस्त्याने एकत्र सुध्दा चालायचे नाही, तिने नवऱ्याच्या मागे 5-10 फुटाचे अंतर ठेवले पाहिजे. एवढेच नाही तर काही ठिकाणी महिलांना चप्पल घालण्यची सुध्दा परवानगी नव्हती. पुरुष मात्र त्या काळातील त्याचा वेश परिधान करुन मोठ्या रुबाबात चलत असे आणि त्याची बायको त्याच्या मागे गुलामा सारखी जात असे. हा सगळा बदल आपण बघतो त्यावेळी पूर्वीच्या काळात जे अत्याचार होत होते त्या अत्याचारांचे स्वरुपही बदलल्याचे आपल्या लक्षात येते.

आज पुरुषांबरोबर स्त्रिया सर्व क्षेत्रात काम करतात हे आपण मान्य केलेले आहे. त्या प्रमाणे त्या कामाला जातात, कुठे तरी एकत्र काम केल्यामुळे मैत्री होण्याची शक्यता असते, मैत्रीतून पुढच्या पायरीवर जाण्याची शक्यता असते. विवाहित स्त्रिया असतात, विवाहित पुरुष असतात, पण हे संबंध अशा पध्दतीने काही तरी विकृतीने पुढे जात असतात आणि मग कुणी नकार दिला तर त्यावर सोपा उपाय म्हणून ॲसिड ॲटकचा वापर केला जातो. आपण प्रत्येक ठिकाणी अशा अत्याचारा विरुध्द किंवा जे शोषण होते त्याविरुध्द खूप कायदे कानून, नियम करतो,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

त्याची अंमलबजावणी करण्यासाठी काय करायचे हे प्रत्येक कार्यालयामध्ये लिहून ठेवतो. पण हे करीत असताना वास्तवातील ज्या काही गोष्टी आहेत त्यासंदर्भात मला पुन्हा एकदा एका नाटकाचे नाव घ्यावेसे वाटते.

"चाहूल" नावाच्या नाटकामध्ये दोघेही पती-पत्नी काम करणारे आहेत. पतीला प्रमोशन हवे आहे. प्रमोशन देण्याची त्याच्या बॉसची तयारी आहे. त्या बॉसने प्रमोशनसाठी विचित्र मागणी केलेली आहे, अशी विचित्र वास्तवता त्या नाटकामध्ये दाखविली आहे. ती वास्तवता दाखविताना त्या स्त्रीचे उत्तर मला या प्रश्नाच्या दृष्टीने महत्वाचे वाटते. नवरा जेव्हा सांगतो की, अशी अशी त्याची मागणी आहे, ती पूर्ण केली तर मला प्रमोशन मिळेल, माझा पगार वाढेल, मला कर्ज मिळेल, मग आपल्याला ब्लॉक घेता येईल यासाठी त्याने मागणी केलेली आहे. पण मी त्याला अजिबात होकार देणार नाही. त्याने मला सांगितले की तुम्ही विचार करुन उत्तर द्या. पण मी त्याला काही उत्तर दिलेले नाही अशी बाजू त्या नाटकातील नवरा आपल्या पत्नी समोर मांडतो आणि ती पत्नी ही आताच्या काळातील स्त्री असल्यामुळे ती ही पतीची भूमिका स्वीकारु शकत नाही. ती त्याला विचारते तू कुठल्या अर्थाने माझा पती आहेत ? ज्यावेळी तुझ्या बॉसने ही मागणी तुझ्या समोर केली त्याच क्षणी तू नोकरीवर लाथ मारुन बाहेर का पडला नाहीस असा प्रश्न विचारणारी आजची स्त्री आहे. म्हणून स्त्रीचा उपयोग हा कोणत्याही कारणासाठी अशा पध्दतीने गैरवापराने होऊ लागला तर आताची स्त्री ते ऐकून घेणार नाही, ती बंड करुन उभी राहील आणि ही तिची बंड करण्याची क्षमता वाढविण्याची आजच्या काळाची गरज आहे. ही गोष्ट कायदे कानून करुन होणार नाही. स्त्रियांनी संघटित होऊन होणार नाही. त्यासाठी सगळया समाजाने त्यांना साथ दिली पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

महोदय, हा प्रश्न केवळ कायदे करुन, आरोपींना शिक्षा करुन सुटणार नाही. प्रत्येक विषयाच्या बाबतीत असे का होते, निर्भया प्रकरणानंतर वर्मा कमिटी नेमली, वर्मा कमिटी झाली म्हणून कायदा आणावयाचा व कायद्याचे आपण स्वागत करावयाचे ही समाजातील कुठली व्यवस्था आहे. या सर्व गोष्टी घडत असताना आपण त्याचा विचार करुन ज्याला आपण प्रिव्हेटिव्ह म्हणतो, अशा गोष्टींचा काही विचार करणार आहोत की नाही हाही प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो. त्यामुळे महिला सबलीकरण, महिलांचे पुरुषा बरोबरचे स्थान सर्व समाजामध्ये होण्यासाठी या विषयाचा अधिक गांभीर्याने विचार करावा आणि महिलांच्या प्रश्नांच्या बाबतीत योग्य पध्दतीने शासनाने पुढची कार्यवाही करावी अशी या निमित्ताने मागणी करतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, आज नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. तसेच काही मुद्यांच्या बाबतीत चर्चाही उपस्थित केली गेली.

सभापती महोदय, या ठिकाणी मला सांगितले पाहिजे की, ही चर्चा करीत असताना त्यांनी खूप काही गोष्टी शासनाच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. या विषयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांचे भाषण झाले. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, समाजाची परिस्थिती बदललेली आहे. लोकांची मानसिकता बदललेली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना सांगू इच्छिते की, आपली पुरुष प्रधान संस्कृती आहे. आजही कोठे तरी पुरुषी वृत्ती महिलांच्या बाबतीत ही थोडीशी दुजाभाव करणारी आहे, ही सत्यता आहे, सत्यता ही स्वीकारली पाहिजे. आजचा काळ बदललेला आहे. समाजाची व्यवस्था बदललेली आहे. महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. सध्या महिला विविध क्षेत्रात काम करीत आहेत. त्या कामाच्या ठिकाणी आपले कर्तृत्व आणि नेतृत्व सिध्द करतात. परंतु महिला काम करीत असलेल्या विभागांमध्ये देखील वेगळया दृष्टीकोनातून बघितले जाते.

महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केला की, कल्याणकारी योजना करणारे डिपार्टमेंट म्हणजेच महिला व बालविकास विभाग आहे. महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन प्रथमत: बदलला गेला पाहिजे. राज्याच्या विकासाचा महत्वपूर्ण घटक महिला हा आहे असा महिलांच्या बाबतीत पहिला दृष्टीकोन असला पाहिजे. समाज असेल, विविध लोक असतील, पक्ष संघटना असतील, शासन असेल यांचा महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन प्रथमत: बदलला पाहिजे. तरच महिलांना खऱ्या अर्थाने न्याय दिल्यासारखे होईल. या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये आपण अपेक्षा करतो की, महिलांची प्रगती झाली पाहिजे. समाज, पक्ष संघटना,शासन यांच्यातील महिलांकडे बघण्याच्या दृष्टीकोन बदलत नाही तो पर्यंत महिलांची पूर्णपणे प्रगती होणे शक्य नाही असे मला वाटते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड...

सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने दोन, तीन गोष्टी बाबतीत चर्चा झाली. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन केले. आज तीन राज्यांच्या मुख्यमंत्री महिला आहेत. यूपीएमधील चेअर पर्सन महिला आहेत. चेअर पर्सन म्हणून श्रीमती सोनिया गांधी काम पहात आहेत. लोकसभेत विरोधी पक्ष नेत्या म्हणून श्रीमती सुषमा स्वराज काम करीत आहेत. लोकसभा अध्यक्षपदी श्रीमती मीरा कुमार आहेत. राजकीय क्षेत्रात ज्या महिला पुढे आल्या आहेत, त्यांनी त्यांच्या क्षेत्रात आपापले नेतृत्व सिध्द केले आहे. आज विविध क्षेत्रात महिलांनी आपापले नेतृत्व सिध्द करुन दाखविले आहे. मी प्रथम गृह विभागाच्या संदर्भात बोलेन आणि त्यानंतर महिला व बालविकास विभागाच्या अनुषंगाने बोलेन.

सभापती महोदय, महिलांच्या सबलीकरणासाठी काय काय उपायोजना करण्यात आलेल्या आहेत त्या बाबतीत सांगू इच्छिते. माझ्याकडे गृह विभागाची टिप्पणी आहे. त्यांनी टिप्पणीमध्ये नमूद केले आहे की, गृह विभागाने महिला सहाय्यक कक्ष आयुक्त व जिल्हा स्तरावर निर्माण केलेले आहेत, या कक्षेत महिला पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे आयुक्त स्तरावर, जिल्हा स्तरावर महिला सुरक्षा समित्या स्थापन केल्या आहेत. या समितीमध्ये महिला डॉक्टर, महिला वकील, महिला प्राध्यापिका, सामाजिक कार्यकर्त्या यांचा समावेश केलेला आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

SGB/ D/ KTG/गितेनंतर 11:15

प्रा.वर्षा गायकवाड.....

फास्ट ट्रॅकच्या संदर्भात माननीय गृहमंत्री माहिती देतील. या संदर्भात काही निर्णय घेतले आहेत. शीघ्र गती न्यायालयाची स्थापना, फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना, भारतीय पुरावा कायदा कलम 155 (4) मध्ये सुधारणा, सीआरपीसी कलम 309 नुसार केसेसची दैनंदिन सुनावणी करणे, दोषारोपपत्र सात दिवसाच्या आत दाखल करणे, दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर 30 दिवसांच्या आत केसेसची सुनावणी प्रकरणे, वैज्ञानिक न्याय सहाय्यक प्रयोगशाळेकडे अभिप्रायासाठी नमुने दिल्यानंतर तीन आठवड्याच्या आत अभिप्राय सादर करणे, सुनावणी इन कॅमेरा करणे, केसेसच्या सुनावणीची प्रसिध्दी करण्यास प्रतिबंध करणे, कायद्यात कमीत कमी व जास्तीत जास्त शिक्षेबद्दल स्पष्ट तरतूद करणे, अशा केसेसच्या सुनावणीसाठी कोर्टात महिला न्यायाधीश असाव्यात, बाधितांना त्वरित मानसिक आधार देणे, अत्याचारीत महिला व मुलीची डीएनए चाचणी करणे, अत्याचारित महिला व मुलींसमोर त्वरित आरोपींची ओळख परेड करणे, पुनर्वसनाबाबत आवश्यक ते प्रयत्न करणे अशा विविध गोष्टी गृह विभागाच्या माध्यमातून सुरु आहेत. गृह विभागाने दोन हेल्पलाईन सुरु केलेल्या आहेत. मुंबईकरिता 103 आणि महाराष्ट्रासाठी वेगळी हेल्पलाईन सुरु केली आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने सुध्दा या संदर्भात काही गोष्टी केलेल्या आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महिला ज्यावेळी तक्रार करण्यास पुढे येतात, मी आकडेवारीच्या खोलात जाऊ इच्छित नाही, पूर्वी संख्या किती होती आणि आता किती आहे हे मी सांगून वेळ घेऊ इच्छित नाही. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यास महिलांची मानसिकता पटकन तयार होत नाही. म्हणून शासनाने निर्णय घेतला की, काही समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशनच्या आवारात असली पाहिजेत. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या केसमध्ये तालुका पातळीवर समुपदेशन केंद्र स्थापन केली पाहिजेत असे सांगण्यात आले होते.

सभापती महोदय, दिनांक 30 जून, 2010 च्या निर्णयानुसार प्रत्येक जिल्हयात जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या माध्यमातून 39 समुपदेशन केंद्रे सुरु आहेत. या व्यतिरिक्त न्यायालयाने जरी तालुका स्तरावर समुपदेशन केंद्र असावे असे सांगितले असले तरी शासनाने असा निर्णय घेतला की, 33 जिल्हयांमध्ये साधारणपणे 3 च्या हिशोबाने 105 समुपदेशन केंद्रे उभी करायची आहेत. त्यातील 51 केंद्रांना परवानगी दिलेली आहे. 46 केंद्रे पोलीस स्टेशनच्या आवारात सुरु झालेली आहेत. 4 ठिकाणी पोलीस स्टेशनच्या आवारात जागा उपलब्ध झालेली.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

नाही. एका केंद्राची जागा आपण बदललेली आहे. अजून 54 समुपदेशन केंद्रांना परवानगी द्यायची आहे. या संदर्भात दिनांक 17.8.2012 व 18.8.2012 रोजी समितीच्या माध्यमातून एक जिल्हा पातळीवर एक समिती असते, तेथील पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली ती समिती छाननी करते. छाननीनंतर राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून प्रस्ताव पुढे येतो. यापुढे आणखी 54 समुपदेशन केंद्रे सुरु करणार आहोत. राज्यात सध्या 90 समुपदेशन केंद्रे सुरु आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी हुंड्याच्या संदर्भात उल्लेख केला आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा, 1961 चा आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने हुंडा प्रतिबंधक नियम 2003 लागू केले आहेत. 26 नोव्हेंबर हा दिवस हुंडा प्रतिबंधक दिवस म्हणून साजरा केला जातो. जी.आर.च्या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती केली आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा, 1961 मधील कलम 8(ब)(4) अन्वये राज्यस्तरीय हुंडा प्रतिबंधक सल्लागार समिती गृहमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली आहे. जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर समित्या संघटित केल्या आहेत.

सभापती महोदय, ज्याचा वारंवार उल्लेख झाला, असे नवीन कायदे अंमलात आलेले आहेत. राज्यात डोमेस्टिक व्हायलन्स ॲक्ट आहे, कौटुंबिक हिंसाचार ॲक्ट आहे, हुंडा प्रतिबंधक ॲक्ट आहे, बाल विवाहासंदर्भात कायदा आहे. या संदर्भात प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. लोकांमध्ये प्रबोधन करणे आणि हे कायदे लोकांपर्यंत पोहोचविणे ही फार महत्वाची गोष्ट असल्यामुळे शासनाने जे नवीन उपक्रम केले आहेत ते मी या ठिकाणी सांगू इच्छिते. 3 जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची व 12 जानेवारी रोजी राजमाता यांची जयंती असते. आम्ही सगळयात पहिला उपक्रम सुरु केला तो म्हणजे, 3 जानेवारी ते 12 जानेवारी या काळात राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जाणीव जागृती अभियान सुरु केले. यामागे उद्देश हा होता की, स्त्री जन्माचे स्वागत करणे, मुलगा-मुलगी भेद नष्ट करणे, हुंड्यासारखी अनिष्ट प्रथा बंद करणे, स्त्रियांवर होणारे अत्याचार मग ते शारिरीक असतील, मानसिक असतील, आर्थिक असतील, भावनिक असतील, लैंगिक असतील, हे अत्याचार होऊ नयेत म्हणून जनजागृती करणे. या काळात आपण जिल्हा स्तरावर मुलींची छेडछाड असेल, लैंगिक अत्याचारविरोधी चळवळ असेल.....

नंतर क्यू.1...

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

प्रा.वर्षा गायकवाड.....

किंवा घरगुती हिंसाचार, बालविवाह प्रतिबंधक कायदा या संदर्भात आपण चर्चा केलेली आहे. हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदीच्या संदर्भात आपण 8 जानेवारी, 9 जानेवारी या रोजी स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात जाणीव जागृती कार्यक्रम घेतला, 10 जानेवारी रोजी जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर कुपोषणाच्या संदर्भात कार्यक्रम घेतला, 11 जानेवारी रोजी किशोरवयीन मुलींचे सबलीकरण यावर चर्चा करण्यात आली होती.

सभापती महोदय, महिलांच्या समस्या ऐकण्यासाठी आपण राज्यस्तरावर, विभागीय स्तरावर प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारच्या कार्यक्रमामध्ये महिला मंत्री आणि महिला राज्यमंत्री तसेच सिनियर महिला आयएएस अधिकारी असणार आहेत. तिसऱ्या सोमवारचा कार्यक्रम जिल्हा स्तरावर होणार असून चौथ्या सोमवारी तालुका स्तरावर कार्यक्रम राबविण्याच्या संदर्भातील जीआर दिनांक 4 मार्च, 2013 रोजी काढण्यात आलेला आहे. त्यामुळे या वर्षी आम्ही महिला लोकशाही दिन साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय,बालगृह,स्वाधारगृह,राजगृह, आधारगृहांची तपासणी होणे आवश्यक आहे. महिलाच्या संदर्भातील स्वाधारगृह,राजगृह,आधारगृह,अल्पमुदतीची गृहे या सर्वाची तपासणी करण्याचे काम महिला समितीला देण्यात आलेले आहे. मधील काळात सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांची माझी भेट झाली त्यावेळेस त्यांनी सांगितले की, आम्हाला जिल्हयातील बालगृहाची तपासणी करण्याचे काम दिले तर फार बरे होईल. त्यामुळे शासनाने दिनांक 5 ऑक्टोबर, 2012 रोजी समिती स्थापन केली आहे. या समितीच्य अध्यक्षा श्रीमती शोभाताई फडणवीस असून त्यामध्ये सर्व महिला सदस्या आहेत. आता या समितीला बालगृहाची तपासणी करता येऊ शकते. या समितीचे दोन रिपोर्ट आम्हाला प्राप्त झालेले आहेत. या समितीकडे सर्व महिला गृहे तपासणीचे काम दिलेले आहे. तसेच या पुढे बालगृहे तपासणीचे सुध्दा काम देण्याचा निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, आम्ही नव्याने दोन तीन योजना प्रस्तावित केलेल्या आहेत. पीसीपीएनडीटी ॲक्टच्या संदर्भात चांगल्या प्रकारचे काम सुरु आहे. आपल्याकडे सन 2009 साली 65 गुन्हयांची नोंद झाली होती, 2010 साली 56 गुन्हयांची नोंद झाली होती, सन 2011 साली 57 गुन्हयांची नोंद झाली होती, सन 2012 साली 36 गुन्हयांची नोंद झाली होती. या केसेस सुरु असून महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून ॲक्टच्या कडक अंमलबजावणीचे काम सुरु आहे तसेच विविध स्तरातून समाज प्रबोधनाचेही काम सुरु आहे. ...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती. विद्या चव्हाण यांनी जागर रॅलीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आपल्याला आठवत असेल की, आपण सर्व जिल्हयांमध्ये अशाच प्रकारची रॅली काढली होती. चंद्रपूर, भंडारा, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रतील सर्व जिल्हयांमध्ये रॅली काढण्यात आली होती. तसेच मुंबई, कोकणच्या सर्व जिल्हयांमध्ये रॅली काढण्यात आली होती. यासंदर्भात एनएसएस तसेच एनसीसीच्या कॅर्डरच्या मुलांनी भाग घेतला होता. यामध्ये काही ठिकाणी निंबध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करुन हा विषय चर्चेला गेला व त्याचा सकारात्मक परिणाम झालेला आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाच्या माध्यमातून "सुकन्या" योजना राबवली गेली आहे. या योजनेमध्ये बीपीएल मधील मुलगी जेव्हा जन्माला येईल तेव्हा तिच्या नावावर 21,400 रुपये रक्कम 18 वर्षापर्यंत ठेवण्याची योजना विचाराधीन आहे.

सभापती महोदय, बलात्काराच्या किंवा ॲसीड हल्ल्याच्या घटना होऊ नये यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. या केसेस फास्ट ट्रॅक कोर्टात चालविल्या गेल्या पाहिजेत. या घटनेतील महिलांना सर्वप्रथम पैशांची गरज भासत असते. या महिलांना मेडीकल चेकअप करण्याची गरज असते, कौन्सीलींग करण्याची गरज असते तसेच लिगल मदत करण्याची गरज असते. त्यामुळे अशा महिलांना आर्थिक सहाय्य करता यावे यासाठी शासनाने योजना प्रस्तावित केली असून ही योजना राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

सभापती महोदय, महिला बालविकास विभागाच्या सर्व योजनांची माहिती आपल्याला असल्यामुळे त्या योजनांचा मी जास्त उल्लेख करणार नाही.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

मी या सभागृहातील सन्माननीय महिला सदस्यांना धन्यवाद देते. ज्यावेळी मी महिला धोरण आखत होते त्यावेळी या सभागृहातील प्रत्येक महिला सदस्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. या समितीमध्ये महिलांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी खूप चांगले भाषण केले आहे. त्यांच्या भाषणातील प्रत्येक मुद्दा महिला धोरणामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. कारण त्या समितीमध्ये एका मोठ्या हिश्श्याचे काम करीत होत्या. या महिला धोरणामध्ये जेंडर बजेटचा पूर्ण टॉपिक समाविष्ट करण्यात आला आहे. विविध विभागाच्या माध्यमातून देखील महिलांवर लक्ष दिले गेले पाहिजे. महिला व बाल विकास विभाग हा काम करीत आहे. त्याच बरोबर इतर विभागांनी देखील बजेट ठेवले पाहिजे व त्या अंतर्गत कोणते काम करणार त्यासंबंधातील माहिती महिला व बाल विकास विभागाला दिली पाहिजे व ती प्रिंट झाली पाहिजे हे आम्ही या महिला धोरणाच्या माध्यमातून सांगत आहोत.

येथे शिक्षणा संबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. आपण मुलींना बारावी पर्यंतचे शिक्षण मोफत दिलेल आहे. दहावी पर्यंतचे मुलींचे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. बारावीमध्ये ते थोडेसे कमी होते. सर्व विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाचा दर 12.5 आहे, तर प्रोफेशनल एज्युकेशनला 2.5 इतका आहे. यात मुलींचे प्रमाण निश्चितच कमी असू शकते. आम्ही असे सुचविलेले आहे की, बारावी पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी मुलींना प्रबोधित करण्यात यावे. एवढेच नव्हे तर आम्ही या धोरणात असे सुचविले आहे की, मुलींना आर्थिकदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी पदवी पर्यंतच्या शिक्षणासाठी उद्युक्त करण्यात यावे. तसेच, अल्पसंख्याक मुलींसाठी संधी उपलब्ध करून देण्यात यावी असे देखील सुचविले आहे.

महिला वसतिगृह असेल, पाळणा घर असेल, याबाबत देखील विचार करण्यात आला आहे. महिलांच्या आरोग्याबाबत देखील चर्चा करण्यात आली. महिला संपूर्ण घराचे आरोग्य बघते. पण स्वत:च्या आरोग्याची काळजी घेत नाही. त्यामुळे एक चॅप्टर हा आरोग्यावर ठेवला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड..

प्रसाधनगृहासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी यांनी चर्चा केली आहे. यासबंधात मी आजच सकाळी वर्तमानपत्रात बातमी वाचली. आर्थिक पाहणीमध्ये देखील महिला प्रसाधनागृहासंबंधीचा उल्लेख आहे. त्यामुळे आम्ही देखील महिला प्रसाधानगृहाचा मुद्दा महिला धोरणामध्ये समाविष्ट केला आहे. जेव्हा आम्ही दौऱ्यावर जातो, विदर्भामध्ये जातो तेव्हा आम्हाला देखील खूप समस्यांना तोंड द्यावे लागते. या धोरणामध्ये आम्ही प्रसाधनगृहासंबंधी काही गोष्टी प्रकर्षाने नमूद केल्या आहेत. महिलांच्या आणि पुरूषांच्याबाबतीत थोडा फरक आहे. रेल्वेमध्ये असेल किंवा रेल्वेच्या बाहेर असेल, सार्वजनिक ठिकाण असेल तेथे महिलांच्या प्रसाधनगृहाचा विचार केला पाहिजे अशी भूमिका मांडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

व्यसन मुक्ती संदर्भात त्यामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. पर्यावरणाचा विषय घेतला आहे. तसेच सांस्कृतिक धोरण देखील समाविष्ट केले आहे. सांस्कृतिक धोरणामध्ये संपूर्ण वंचित वर्ग यामध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

येथे महिला आणि उद्योग यांचा उल्लेख करण्यात आला आहे. यासंबंधी आपण जी.आर. काढलेला आहे. आपले उद्योग धोरण जाहीर झाले आहे. 10 टक्क्यापैकी 5 टक्के जागा एस.सी., एस.टी.आणि महिलांसाठी देण्याचा निर्णय झालेला आहे. पण यात "प्राधान्याने" हा शब्द समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे आम्ही यात "प्राधान्य" हा शब्द न येता ठोस निर्णय व्हायला हवा असे या धोरणाच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

महिला व कायदे हा देखील खूप महत्त्वाचा विषय आहे. पुरूषांचे काही वेगळे म्हणणे असू शकेल. एखादी केस चुकीची होत असेल तर त्यादृष्टीने बघणे हे देखील चुकीचे आहे. तसा उल्लेख देखील यात करण्यात आलेला आहे.

राजकीय महिलांच्या सक्षमीकरणाचा प्रश्न सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उपस्थित केला आहे. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण 50 टक्के महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आल्या आहेत. आता सातत्याने नवीन महिला राजकारणामध्ये येत आहेत. पूर्वी राजकारण हे पुरूषप्रधान संस्कतीसाठीच आहे असे मानले जायचे. पण आज मुलींना देखील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड..

राजकीय क्षेत्रात येण्याची इच्छा झालेली आहे. मला कॉलेज जीवनात वाटायचे की, मी राजकीय क्षेत्रात करीअर करावे. मला फॅमिली बॅकग्राऊंड आहे तो भाग वेगळा. आता एक प्रोफेशन कोर्स म्हणून राजकीय क्षेत्राकडे बघितले पाहिजे. तसा दृष्टिकोन देखील आम्ही या धोरणाच्या माध्यमातून घेतलेला आहे.

ज्यांना कोणीच सांभाळणारे नाही मग त्या प्रौढ महिला असतील, कुमारिका असतील, ज्यांना सोडलेले असेल त्या परितक्त्या महिला असतील अशा सर्व एकल महिलांचा समावेश या महिला धोरणात केलेला आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

सभापती महोदय, तमाशा कलावंताचे प्रश्न आहेत. आपण मध्यंतरी लोककला संमेलन आयोजित केले होते. तमाशामध्ये काम करणाऱ्या महिला वंचित समाजातील आहेत. त्यांचे प्रश्न वेगळया स्वरुपाचे आहेत. त्यांचा देखील महिला धोरणाच्या प्रारुपात समावेश केलेला आहे.

सभापती महोदय, देवदासींच्या संदर्भात काही धोरण घेण्यात आले होते. त्यामध्ये आणखी दोन-तीन नवीन गोष्टींचा समावेश केलेला आहे. त्यानुसार देवदासींच्या मुलांना शिष्यवृत्तीसाठी 1600 रुपये तर मुलींसाठी 1750 रुपये शिष्यवृत्ती केलेली आहे. त्यांच्या क्षेत्रात चांगले काम करणाऱ्यांना पुरस्काराची घोषणा केलेली आहे. त्या व्यतिरिक्त त्यांच्या अन्य मागण्या होत्या त्याचा देखील महिला धोरणात उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, महिला धोरणाच्या प्रारुपावर दोन दिवस चर्चा केली पाहिजे. महिला धोरणाचे प्रारुप दिनांक 8मार्च रोजी जाहीर करण्यात आले. त्या कार्यक्रमाला सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस आणि सन्माननीय सदस्या श्रीमती दीप्ती चवधरी उपस्थित होत्या. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई उपस्थित नव्हत्या. त्यावेळी सांगण्यात आले होते की, हे महिला धोरण वेबसाईटवर टाकण्यात येईल. त्या संदर्भात ज्या काही हरकती अथवा सूचना असतील त्या मागविण्यात येतील, त्यावर चर्चा होईल. त्यानंतर आपण हे धोरण आणणार आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या अधिवेशनाचा कालावधी दिनांक 18 एप्रिल 2013 पर्यंत आहे. माननीय श्री.शरद पवार यांनी महिला धोरण जाहीर केले होते. त्या संदर्भात कृती आराखडा करण्यात आला होता त्याची अंमलबजावणी झाली काय ? या महिला धोरणावर दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना आपली मते मांडण्यासाठी एक चर्चा ठेवावी. कारण या महिला धोरणावर पुरुष सदस्यांनी मते मांडणे फार आवश्यक आहे कारण त्या शिवाय या धोरणाची अंमलबजावणी होणार नाही. तेव्हा या विषयावर सविस्तर चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, हा आपल्या अखत्यारितील निर्णय आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे महिला धोरण वेबसाईटवर टाकलेले आहे. त्यावर सजेशन आणि ऑब्जेक्शन देऊ शकता. या मसुद्याचे प्रारुप इंग्रजीमध्ये असावे असे मला पत्र आले होते. तेव्हा या मसुद्याच्या प्रारुपाचा इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्ये अनुवाद करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी सांगितले की, बँकेमध्ये किंवा अन्य ठिकाणी काम करताताना महिलांचे लैंगिक शोषण होते. त्या संदर्भात सांगू इच्छितें की, विशाखा गाईडलाईन्सनुसार केंद्र सरकारने "Sexual harassment Prohibition Bill" आणलेले आहे. ते विधेयक राज्य सभेमध्ये मंजूर झालेले आहे. लोकसभेमध्ये मंजुरीसाठी येईल. त्या व्यतिरिक्त केंद्र सरकारने आणखी दोन विधेयके आणलेली आहेत. "The Criminal law amendment Bill, 2012" आणि "Protection of child from Sexual offence Bill, 2012" या दोन्ही विधेयकामध्ये लैंगिक शोषणा संदर्भात फार मोठ्या शिक्षा सुचविण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी महिलांच्या प्रश्ना संदर्भात सन्माननीय महिला सदस्यांनी आणि पुरुष सदस्यांनी चांगली चर्चा केली. भविष्यात देखील चांगल्या प्रकारचे चर्चा होईल अशी मी अपेक्षा व्यक्त करते आणि आपल्या सर्वांचे आभार मानून माझे भाषण पूर्ण करते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई आणि अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वये महिलांच्या प्रश्ना संदर्भात जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर चर्चा होत असताना विधि व न्याय विभागाशी संबंधित दोन-तीन मुद्दे उपस्थित झाले. त्या संदर्भात खुलासा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महिलांवरील अत्याचारा संदर्भातील कोर्टात असलेल्या केसेस निकाली काढण्यासाठी विधि व न्याय विभागाचे तसेच माननीय उच्च न्यालयायाने जे निर्णय घेतलेले आहेत ते मी येथे सांगतो.

सभापती महोदय, राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या संदर्भात गंभीर स्वरुपाच्या केसेसची संख्या 8904 आहे. तर मॅजेस्ट्रीट कोर्टामध्ये वेगवेगळ्या स्तरावर असलेल्या केसेसचे प्रमाण निश्चितपणे जास्त आहे. दिनांक 8 मार्च हा "जागतिक महिला दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. महिला दिनाच्या पूर्वसंध्येला राज्याचे मुख्य न्यायाधीश यांनी अतिशय महत्वपूर्ण निर्णय घेतला. महिलां संदर्भातील सिरीयस प्रकरणे दिनांक 30 एप्रिल, 2013 पर्यत निकाली काढावेत अशाप्रकारचे त्यांनी आदेश दिलेले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व त्यामध्ये गती येण्यासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. या कामी त्यांनी न्यायमूर्ती सर्वश्री चव्हाण, दळवी, बलदोटा यांची स्वतंत्र नेमणूक केलेली आहे. तसेच त्या न्यायमूर्तींनी प्रत्येक महिन्याचा अहवाल, आढावा आणि माहिती मुख्य न्यायमूर्तींना वेळोवेळी कळविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

महोदय, खुल्या वातावरणात महिलांना आपली गाऱ्हाणी, आपल्यावरील अन्याय, अत्याचार मोकळेपणाने मांडता यावा म्हणून या कोर्टात काम करणारे बेंच क्लार्क, स्टेनोग्राफर, इंटरप्रीटर, टायपिस्ट कम क्लार्क, हवालदार, शिपाई या सर्व पदांवर महिलांची नेमणूक केलेली आहे. जेणेकरुन महिलांना आपल्या समस्या मोकळेपणाने मांडता याव्यात. रेप, ॲट्रॉसिटी, किडनॅपींग, मर्डर अशा प्रकरणांचा निपटारा करण्याचा सुध्दा निर्णय घेतलेला आहे.

महोदय, आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी अशा प्रकारची 13 न्यायालये सुरु करण्याचा निर्णय राज्य सरकारने आणि मुख्य न्यायमूर्तींनी घेतला आहे. अशा प्रकारच्या महत्त्वपूर्ण निर्णयांतूनच निश्चितपणे महिलांना न्याय मिळेल, अशी माझी भावना आहे.

महोदय, हा महिला आणि पुरुषांचा प्रश्न नाही. आपल्या संस्कृतीमध्ये महिलांना सातत्याने प्राधान्य दिलेले आहे. मी या ठिकाणी पुरुष म्हणून बोलत नाही. समाजामध्ये सर्व प्रश्न कायद्याने सुटतात असा आपला समज असेल तर माझी नम्रपणे विनंती आहे की, या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कायद्याची मदत घ्यायलाच पाहिजे. परंतु कायद्यापेक्षा जास्तीत जास्त समाज प्रबोधनाने आणि सामंजस्याने हा प्रश्न सोडविला पाहिजे.

महोदय, स्त्री-पुरुष ही दोन समाज मने आहेत. ती समाजाची दोन चाके आहेत. ही दोन्ही चाके एकत्रितपणे चालली तरच संसाराचा आणि संस्कृतीचा गाडा सुरळीतपणे चालेल. सातत्याने एका बाजूने आघात करीत गेलो तर कळत-नकळत त्याचे वळ उमटतात आणि त्याचा दुष्परिणाम होतो. माझे स्पष्ट म्हणणे आहे की, दोघांच्या सामंजस्यामुळे, जास्तीत जास्त समजूतदारपणे काम करणे आवश्यक आहे. कायदा हा न्याय मिळविण्यासाठी, दोन्ही मनांमध्ये सामंजस्य निर्माण करण्यासाठी आहे. कायदा हा कोणावर आसूड ओढण्यासाठी नाही, अशा प्रकारचे प्रबोधन समाजामध्ये झाले पाहिजे. शेवटी कमी-जास्तपणा हा असतोच. म्हणून दोन्ही बाजूंनी या गोष्टी सामंजस्याने घेतल्या तरच हे योग्यप्रकारे चालू शकते. असते. दिवसाबरोबर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

रात्र, चढाबरोबर उतार, सुखाबरोबर दु:ख, भरतीबरोबर ओहोटी या दोन्ही गोष्टी जशा हातात हात घालून चालतात, तशाच प्रकारे स्त्री-पुरुषांनी हातात हात घालून चालण्याचा विचार केला तरच हे सर्व सुरळीतपणे चालेल. समाजाचे प्रतिनिधीत्व करीत असताना आपण सर्वांनी त्या दृष्टीने संदेश पाठवावा. सातत्याने महिलांच्या वृध्दीकरणासाठी, महिलांच्या हक्कासाठी, महिलांना संधी मिळवून देण्यासाठी पुरुष समाज सुधारकांनीच जास्तीत जास्त लक्ष घातले आहे. तीच भावना आम्ही सर्व पुरुष मंडळी ठेवून चालणार आहोत, असे विनम्रपणे सांगून आपली रजा घेतो.

उप सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.39 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विक्रम काळे)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 12.15 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.00 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>विधान भवन परिसरात घडलेल्या घटनेबाबत खेद व्यक्त करणे</u>

सभापती : काल दिनांक 19 मार्च, 2013 रोजी विधान भवन परिसरामध्ये घडलेल्या घटनेबाबत हे सभागृह खेद व्यक्त करीत आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत

(1) * 37317 **श्री.सुभाष चव्हाण, श्री.मोहन जोशी, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, ॲड.अनिल परब, श्री.विनायक राऊत** : **तारांकित प्रश्न क्रमांक 30765 ला दिनांक 25 जुलै, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, स्मारक उभारणीसाठी आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले आहे काय,

(4) असल्यास, या प्रकल्पासाठी चालू अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(5) सदर स्मारक किती कालावधीत बांधून पूर्ण होणार आहे,

(6) अद्याप, प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) ते (6) दादर येथील इंदू मिल क्र.6 च्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर जागा प्रस्तावित स्मारकासाठी आरक्षित करणेसंदर्भात बृहन्मुंबईच्या मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 37(1अेअे) खाली फेरबदल करणेचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याअनुषंगाने फेरबदलाबाबत नागरिकांच्या हरकती/ सूचना मागविण्याबाबतची सूचना दिनांक 1/12/2012 रोजी प्रसिध्द केलेली असून याबाबत वैधानिक कार्यवाही सुरु आहे.

सदर जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्याकामी प्रथम सर्वसंबंधितांशी विचार विनिमय करुन प्रस्तावित स्मारकाची संकल्पना निश्चित करणे व तद्नंतर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वास्तुशास्त्रज्ञाकडून सदर स्मारकाचे वास्तुशास्त्रीय संकल्पचित्रे तयार करुन घेणे अशी शासनाची भूमिका आहे. सदर स्मारकाची संकल्पना व त्यानुषंगिक वास्तुशास्त्रीय संकल्पचित्रे यास मान्यता देण्यापूर्वी सर्व संबंधितांशी विचार विनिमय करुन तद्नंतर मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दादर चैत्यभूमी विकास व सौंदर्यीकरण सुकाणू समिती यांच्या स्तरावर त्यास मान्यता देवून पुढील कार्यवाही करण्याचा शासनाचा मानस आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर स्मारकासाठी आवश्यक तो निधी राज्य शासनाकडून अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदर स्मारकाची वास्तुशास्त्रीय संकल्प चित्रे व अंदाजपत्रके तयार झाल्यानंतरच स्मारक उभारणीस किती कालावधी लागेल हे निश्चित होईल. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी व / वा त्यांचे देखभाली व व्यवस्थापनाकरिता स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करणे प्रशासकीय दृष्ट्या उपयुक्त व प्रशस्त वाटल्यास शासन त्यासदंर्भात उचित विचार करेल.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37317.....

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जागा मिळविल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. मुंबईच्या मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 37 (1अेअे) खाली फेरबदल करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याबद्दलही मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. शासनाने या स्मारकाच्या सर्व कामांसाठी पुढाकार घेतलेला आहे. त्यासंबंधी शासनाने सविस्तर व चांगले उत्तर दिलेले आहे. परंतु या प्राधिकरणाची घोषणा केव्हा करणार आणि या कामासाठी बजेटमध्ये तरतूद करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाबाबत अतिशय विस्ताराने माहिती दिलेली आहे. या स्मारकाच्या तरतुदीबाबत त्यांनी सांगितले की, या स्मारकाचे आराखडे तयार केले जातील. जागतिक दर्जाच्या आर्किटेक्टना बोलविले जाईल. आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे स्मारक करावयाचे असल्यामुळे पैशाची कमतरता पडू देणार नाही. पण बाकीच्या प्राथमिक गोष्टी करणे महत्वाचे आहे. त्या दृष्टीकोनातून शासनाने तातडीने त्या कामाची सुरुवात केलेली आहे. प्राधिकरण नेमण्याबाबतही त्यांनी सूतोवाच करताना असे म्हटले होते की, प्रथम स्मारक उभे करावे लागेल आणि नंतर मेंटेनन्स करण्याबाबत ॲथोरिटी ठरविण्याचा निर्णय घेतला जाईल. कालच नगरविकास विभागाने या कामाची पूर्तता करण्यासाठी, हा विषय पुढे नेण्यासाठी एमएमआरडीए हे एक प्राधिकरणच असल्यामुळे या प्राधिकरणाला या कामासाठी प्राधिकृत केलेले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा विषय वर्षानुवर्षे प्रलंबित होता. पण या कामासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन आणि सर्व पक्षांचे राज्यात एकमत करुन केंद्र सरकारसमोर हा प्रश्न मांडलेला आहे. या कामामध्ये बऱ्याच अडीअडचणी होत्या, त्यावर त्यांनी मात केली त्यामुळे त्यांचे संपूर्ण देशभर, राज्यभर कौतुक झालेले आहे. त्यांच्याबद्दल जनतेच्या मनात चांगली भावना आहे. जागतिक दर्जाचे व सर्वोत्कृष्ट स्मारक व्हावे ते लवकर व्हावे यासाठी कालमर्यादा ठरविण्यासंबंधी शासनाचे काय धोरण राहणार आहे ?

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37317.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नामध्येच उत्तर आहे. हे जागतिक दर्जाचे व सर्वोत्तम स्मारक करावयाचे असल्यामुळे जगातील सर्वोत्तम तज्ज्ञांची स्पर्धा घेऊन वेगवेगळे प्लॅन व डिझाईन गोळा करावे लागतील. त्यामुळे कालावधीबाबत आताच निश्चित काही सांगता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार : या स्मारकाचे काम लवकरात लवकर होईल हे सांगितल्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. माझे दोन प्रश्न आहेत. डीसीआर 58मध्ये बदल करणे आवश्यक आहे. कारण एनटीसी बरोबर टीडीआरच्या विषयातील भूमिका शासन घेणार आहे. त्यासाठी डीसीआर 58 मध्ये शासनाने बदल केले आहेत काय ? नसल्यास, हे बदल केव्हा करण्यात येतील ? एमओईएफची 6 जानेवारी 2011ची नोटिफिकेशन आहे. आपल्याला जर सीआरझेड मधील प्लॉटचा टीडीआर जनरेट करावयाचा असेल तर त्यासाठी रिलॅक्सेशन लागणार आहे. ही रिलॅक्सेशनची परवानगी केन्द्र सरकारकडून प्राप्त झालेली आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : ज्यावेळी केन्द्रीय वस्त्रोद्योग मंत्री महोदयांनी लोकसभेमध्ये घोषण केली त्यावेळी त्यांनी ही जागा राज्य शासनाला देण्यात येईल असे सांगितले. ती कोणत्या प्रकारे देण्यात येईल, त्यांना टीडीआर द्यावा लागणार आहे का, रोखीने कॉम्पेन्सेशन द्यावे लागणार आहे का, की सीआरझेडमध्ये त्यांना देता येईल का, त्यासाठी डीसीआरमध्ये बदल करावा लागेल का ? असे प्रश्न आहेत. हा इंडस्ट्रियल झोन असल्यामुळे डीपीमध्ये देखील बदल करावा लागेल. या सगळय गोष्टी करण्याकरिता शासनाने प्रोसेस सुरु केलेली आहे. या गोष्टीला अद्याप अंतिम स्वरुप आलेले नाही. परंतु या संदर्भात जी काही कार्यवाही करावी लागेल ती शासन करणार आहे.

श्री. भाई जगताप : या प्रश्नाचे उत्तर सकारात्मक आहे. त्याबद्दल दुमत नाही. याबाबतीत कुठेतरी टाईम फ्रेम असली पाहिजे. आपण आंतरराष्ट्रीय दर्जाचे विकासक, आर्किटेक्ट नेमणार आहात. हे स्मारक आंतरराष्ट्रीय दर्जाचे करीत असताना त्यासाठी वेळ देखील आंतरराष्ट्रीय घेण्याची आवश्यकता आहे. जी जी आंतरराष्ट्रीय कामे झालेली आहेत ती वेळेत झालेली आहेत. म्हणून हे काम करण्याच्या बाबतीत आपण स्वत:ला वेळेचे बंधन घालून घेतले नाही तर हे काम असेच चालेल. याबाबतीत डीसी रुलमध्ये बदल करावा लागेल. हा बदल करण्याची बाब राज्य शासनाच्या आणि केन्द्र शासनाच्या अखत्यारितील आहे. या डीसी रुल्समधील बदल किती कालावधीत होतील. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ज्या निविदा मागविण्यात येणार आहेत त्याबाबतीत काय टाईमफ्रेम असेल ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : मी सांगितले की, या संदर्भात शासनाकडून कालच नोटिफिकेशन काढण्यात आलेले आहे. एमएमआरडीएला आपण प्राधिकृत केलेले आहे. ही प्रक्रिया शासनाच्या पातळीवर सुरु आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी प्राधिकरणाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला नाही. मी महाराष्ट्र सरकारच्या आणि केन्द्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या प्रोसेस संबंधी प्रश्न विचारले आहेत. माझ्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अतिशय महत्वाच्या विषयाबद्दल सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि या कामामध्ये सर्वांचेच सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. हे काम किती लवकर होईल अशा अपेक्षा असणे बरोबर आहे. राज्य मंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे कालच एमएमआरडीएला काम करण्याकरिता स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून घेतलेले आहे. कारण तेही प्राधिकारण आहे. त्याच बरोबर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असलेली सुकाणू समिती हे काम पहात आहे. याच समितीने इंदू मिलची जागा घेण्याचे पहिल्यांदा सुचविले होते. आर्किटेक्ट शोधण्याचे, इण्टर नॅशनल कॉम्पिटिशन करण्याचे काम एमएमआरडीएला देण्यात येईल. त्यामधून प्रोजेक्ट मॅनेजमेण्ट कन्सल्टण्ट नेमून आपल्याला पुढे जाता येईल. राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे एमएमआरडीएच्या माध्यमातून कामाला सुरुवात व्हायला लागली की पुढे काय करायचे, त्याची व्यवस्था कोणी पहायची, यासाठी एखादी वेगळी व्यवस्था, एखादा ट्रस्ट, एखादे वेगळे प्राधिकरण करावे लागेल आणि त्यावेळी तो प्रश्न घेता येईल.

...नंतर श्री. गिते

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय,या ठिकाणी दोन स्पेसिफिक प्रश्न विचारले गेले आहेत. डी.सी.रुल बदलण्याकरिता 37 (1)(A) ची सूचना दिनांक 1.12.2012 रोजी काढली होती. त्या बाबतीत हरकती व सूचना मागविण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. त्या बाबतीत हरकती व सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या हरकती व सूचनांची तपासणी तसेच सुनावणी झालेली आहे. म्हणून डी.सी.रुल 27 (2) ची कार्यवाही या आठवडयाभरामध्ये कधीही करण्यात येईल आणि ती प्रक्रिया पूर्ण होईल. त्याच बरोबर महाराष्ट्र कोस्टर झोन ॲथॉरिटी आणि नॅशनल कोस्टल मॅनेजमेंट ॲथॉरिटीने सी.आर.झेड.चे नियम आहेत, त्यामध्ये बदल करण्यास मान्यता दिलेली आहे. या बाबतीत पुढील कार्यवाही व्हावयाची आहे. या संदर्भात योग्य पध्दतीने काम चाललेले आहे.

महोदय, केंद्र सरकारने संसदेमध्ये घोषणा केली आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील उत्तराच्या वेळी मी सांगितले आहे की, या स्मारकाच्या कामासाठी निधीचा कोणीही विचार करु नये. या स्मारकाच्या बांधकामासाठी जो काही निधी लागेल, त्या निधीची शासनाच्या माध्यमातून तरतूद करण्यांत येईल. टोकन तरतूद करुन कोणाचे समाधान करण्याचा उद्देश नाही. या स्मारकासाठी कितीही निधी लागला तरी तो निधी उपलब्ध करुन देण्यास शासन मागे-पुढे पहाणार नाही. हे राज्यपातळीवरील स्मारक नाही. ते राष्ट्रीय पातळीवरील स्मारक होणार आहे. ते स्मारक आंतरराज्यीय दर्जाचे झाले पाहिजे. या स्मारकासाठी लागणाऱ्या निधीच्या बाबतीत कोणीही शंका, कुशंका काढू नये. एमएमआरडीएलला स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी करण्यामागचा उद्देश तोच होता. किरकोळ मंजुऱ्या, तसेच बजेट प्रोव्हीजन न करता त्यांना हे काम पुढे करता येईल. त्यांना स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत की, या स्मारकासाठी एक चांगला आर्किटेक्ट निवडण्याची प्रक्रिया सुरु करा. या बाबतीत सुकाणू समिती आहे. या स्मारकासंबंधी डिझाईन्स पुढे येतील त्यातील कोणते डिझाईन करावयाचे या बाबतीत विरोधी पक्ष नेते, गट प्रमुख, तसेच केंद्रीय तज्ज्ञ यांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला जाईल. एकदा स्मारकाचे डिझाईन फायनल झाले की, पुढची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, आज 20 मार्च आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळयाच्या ठिकाणी सत्याग्रह केला होता तो दिवस आहे. आज महाड येथे लक्षावधी बंधू जमणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांना धन्यवाद देतो की, त्यांचा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37317....

श्री.भाई गिरकर...

आजच प्रश्न लागलेला आहे. इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होणार आहे, यात आंतरराष्ट्रीय कॉम्पीटीशन आहे. कॉम्पीटीशन काय आहे हे मला कळले नाही. या स्मारकाच्या बाबतीत आर्किटेक्चरकडून प्लॅनींग मागविणार आहात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार व सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, या स्मारकासाठी शासनाने बजेटमध्ये तरतूदच केलेली नाही. या स्मारकासाठी निधीची कमतरता भासणार नाही असे या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. दिनांक 14 एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे, त्या दिवशी स्मारकाच्या कामास सुरुवात करण्यात येईल व त्या कामासाठी एवढया निधीची तरतूद करण्यात आलेली आहे या बाबतची माहिती दिली गेली तर बरे होईल.

श्री.भास्कर जाधव : या बाबतीत सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे. या स्मारकाच्या कामासाठी लागणाऱ्या निधीच्या बाबतीत शंका, कुशंका घेण्याचे कारणच नाही.

श्री. विनायक मेटे : मी शासनाला अतिशय स्पष्टपणे विचारु इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत घोषणा केलेली आहे. ती घोषणा होऊन अनेक महिने झाले आहेत. त्यासंदर्भात शासनाच्या माध्यमातून कार्यवाही होत आहे ही एक चांगली गोष्ट आहे. परंतु या संदर्भातील सर्व गोष्टींचा निर्णय घेण्याकरिता एनटीसी बरोबरच्या काही गोष्टी, डी.सी.रुलच्या बाबतीतील काही गोष्टी, आराखडयाच्या बाबतीतील काही गोष्टी, परवानग्या मिळवून घेण्याबाबतच्या गोष्टी असतील या गोष्टी एमएमआरडीच्या माध्यमातून होणार आहेत असा आपण उल्लेख केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होण्यासाठी समिती स्थापन केली आहे, या स्मारकाच्या बाबतीत देखील एक समिती स्थापन करुन त्या समितीतील काही लोकांकडे हे काम सोपविले जाईल काय ? सदर स्मारक पूर्ण होण्याच्या कालावधी शासनाकडून सांगितला जाईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक सुकाणू समिती अस्तित्वात आहे. या बाबतीत वेगवेगळया पक्षातील गट नेत्यांची मते अजमावून घ्यावयाची

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतील तर त्यांना देखील चर्चेला बोलाविले जाईल असेही माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरात नमूद केले आहे. त्यामुळे आज तरी अन्य कोणती समिती स्थापन करण्याची आवश्यकता वाटत नाही.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भंडारा नगरपरिषदेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरची रक्कम न दिल्याबाबत

(२) * ३७९८४ श्री.मितेश भांगडिया, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.एम.एम.शेख : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना निवडश्रेणी लागू करणे तसेच इतर अन्य मागण्यांबाबत मागील दोन वर्षापूर्वी मागण्या मान्य करण्याचे संबंधित विभागाने आश्वासन देऊनही अद्याप सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे भंडारा जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनने बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१२ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच भंडारा नगरपरिषदेच्या ३०० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे ३ कोटी ७५ लाख रुपये १० वर्षापासून देय असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांपैकी ५ व्यक्तीचा वैद्यकीय उपचार न झाल्यामुळे मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतरची रक्कम लवकरात लवकर प्राप्त होणार आहे काय, तसेच प्रलंबित वर्षाचे व्याज देखील प्राप्त होणार आहे काय,

(५) असल्यास, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.भास्कर जाधव,श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) नाही.

(२) हे खरे नसून भंडारा नगरपरिषदेतील सेवानिवृत्त झालेल्या एकूण ९४ कर्मचाऱ्यांना उपदानापोटी रू.१,०४,५४,१७९/- व रजा रोखीकरणापोटी रु.१,१२,०२,६९४/- इतकी रक्कम देणे बाकी आहे.

(३) हे खरे नाही.

५...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(४),(५) व (६) याबाबतीत नागरपरिषदेकडून दिनांक ३१/१२/२०१२ रोजी प्राप्त झालेला प्रस्ताय शासनाच्या विचाराधीन आहे.

प्रलंबित रकमेवर व्याज देण्याबाबत नगरपरिषदेचा प्रस्ताव नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, भंडारा नगरपरिषदेने शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावावर किती दिवसात निर्णय घेण्यात येईल?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शासन स्तरावरुन नेमलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाकडून दिले जाते. उर्वरित कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, उपदान आणि रजा रोखीकरणाची रक्कम नगरपरिषदेने द्यायची असते. त्यासाठी नगरपरिषदांनी आर्थिक तरतूद करणे आवश्यक असते. या प्रकरणामध्ये नगरपरिषदेने आर्थिक तरतूद केलेली नाही. भंडारा नगरपरिषदेला प्रॉपर्टी टॅक्स, वॉटर टॅक्स आणि इतर सोर्सेसमधून जे उत्पन्न मिळते त्याचा विचार करता खर्चाबाबत नियंत्रण न ठेवल्यामुळे हा प्रश्न उद्‌भवला आहे. नगरपरिषदेची स्वत:ची वसुली फार कमी आहे. 2007 पर्यंत कर्मचाऱ्यांना व्यवस्थितपणे त्यांची देणी दिली जात होती. 1984 नंतर जे कर्मचारी निवृत्त झाले त्यांची पेन्शन सुरु आहे. फक्त अर्जित रजेच्या रोखीकरणाची व उपदानाची रक्कम देणे बाकी आहे. शासन नगरपरिषदांना जे सहाय्यक अनुदान देते त्यासाठी रु.295.83 कोटी रुपयांची पुरवणी अर्थसंकल्पात तरतूद केलेली असल्यामुळे त्या माध्यमातून काही प्रमाणात हा प्रश्न मार्गी लागेल असा विश्वास वाटतो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना वेळेवर पेन्शन मिळत आहे. परंतु उपदान आणि रजा रोखीकरणाची रक्कम देण्यासाठी तरतूद केल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. ही रक्कम देण्यास चार ते पाच वर्षे विलंब झालेला आहे. हा विलंब नगरपरिषदेच्या स्तरावर झाला की शासनाच्या स्तरावर झाला आहे? विलंब झालेल्या कालावधीकरिता व्याज देणे बंधनकारक आहे. ती व्याजाची रक्कम संबंधितांना दिली जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही जबाबदारी संपूर्णपणे स्थानिक स्वराज्य संस्थांची असते, शासनाची नाही हे मी यापूर्वीच सांगितले आहे. जी रक्कम देणे शिल्लक आहे ती देण्याची जबाबदारी भंडारा नगरपरिषदेची आहे. ज्याप्रमाणे शासनाकडून वार्षिक बजेट सादर केले जाते त्या वार्षिक बजेटमध्ये वेगवेगळ्या हेडखाली रक्कम राखून ठेवण्यात येते, त्याच पध्दतीने नगरपरिषदांनी आपल्या बजेटमध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनासह निवृत्तीनंतरचे आर्थिक फायदे देण्यासाठी तरतूद करावी या संदर्भात निर्णय घेण्याचा शासनाचा विचार आहे. दरवर्षी नगरपरिषदांनी काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रक्कम या कामासाठी राखून ठेवली तर कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर आर्थिक देणी देण्यामध्ये जी अडचण निर्माण होते ती उपस्थित होऊ नये यासाठी कायद्यात तरतूद करण्याचा किंवा तशा प्रकारचा नियम करण्याचा शासनाचा विचार आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, शासनाकडून नगरपरिषदांना सहाय्यक अनुदान देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले त्यावेळी सेवेत असलेले कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचारी यांची आर्थिक देणी सहाय्यक अनुदानाच्या माध्यमातून दिली जावीत आणि शासनाकडून या सहाय्यक अनुदानात दरवर्षी 10 टक्के वाढ दिली जाईल अशी संकल्पना होती. शासनाने सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचा विचार केला, परंतु जे कर्मचारी निवृत्त झाले त्यांचा विचार केला नाही. जे धोरण ठरले होते त्याप्रमाणे अंमलबजावणी होत नाही. याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, 1999 साली अ, ब व क वर्ग नगरपरिषदांची जकात राज्य शासनाने बंद केली. त्या बदल्यात त्यांना सहाय्यक अनुदान देण्याचा आणि त्यात दरवर्षी 10 टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता ही गोष्ट खरी आहे. त्या निर्णयानुसार पूर्णपणे निधी दिला गेला नव्हता. काही रक्कम देणे शिल्लक राहिले होते. ती रक्कम देण्यासाठी रु.295.83 कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागण्यांद्वारे करण्यात आली आहे. निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची देणी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. नगरपरिषदांकडून शासनाकडे माहिती सादर होताना चुकीची माहिती प्राप्त झाली. काही नगरपरिषदांनी कर्मचाऱ्यांची संख्या जास्त दाखवून अधिकची रक्कम घेतली होती तर काही नगरपरिषदांनी कर्मचाऱ्यांची संख्या कमी दाखविल्यामुळे त्यांना अपेक्षित वेतनाची रक्कम देणे आवश्यक होते. शासनाकडून देय अनुदानापेक्षा कमी निधी जात होता.

नंतर झेड.1...

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

या सर्वांचे समायोजन आता आम्ही केलेले असून समायोजनेच्या रकमेपोटी 295.83 कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये करण्यात आली असल्यामुळे यातून बराचसा प्रश्न निकाली निघेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी प्रोव्हीजन करण्याची सूचना केली जाईल असे उत्तर दिलेले आहे. परंतु या राज्यातील शासकीय कर्मचारी तसेच कामगारांना ग्रॅज्युइटीचे पैसे देण्याचा कायदा आहे. कामगार किंवा कर्मचारी निवृत्त झाल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी त्यांची सर्व देणी दिली पाहिजे असा कायदा आहे. असे असतांना ज्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा ज्या महानगरपालिकेने प्रोव्हीजन असतांना ते पैसे इतरत्र वापरले त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना समजावून सांगण्यात मी कमी पडलो असेल किंवा त्यांच्या लक्षात आले नसेल. कामगारांना पेन्शन देणे याबद्दलचा कायदा नाही असे मी म्हणालो नाही. मी असे म्हणालो की, आपण जे वार्षिक बजेट मांडतो त्या बजेटमध्ये तशा प्रकारची प्रोव्हीजन केली तर पुढे त्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे कर्मचाऱ्यांची देणी दिली जात नाही त्यामुळे यासंदर्भात तरतूद करावी लागणार आहे. परंतु अशा प्रकारची तरतूद करीत असतांना महालेखाकारांचे म्हणणे काय आहे ते मागवले असून त्यांचे म्हणणे आल्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिराळा (जि.अमरावती) येथील सरकारी स्वस्त धान्य दुकानातील भ्रष्टाचाराबाबत

(३) * ३७०२३ श्री.प्रवीण पोटे पाटील, डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.अमरावती) येथील स्वस्त धान्य दुकानातून गोरगरिबांना कमी किंमतीत धान्य पुरविले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिराळा येथील स्वस्त धान्य दुकानाद्वारे युरीया व सिमेंट मिश्रीत गहू, तांदुळाची चुरी इतर अत्यंत निष्कृष्ट दर्जाचे धान्य पुरविले जात असल्याचे डिसेंबर, २०१२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे नागरिकांच्या जीविताशी खेळणाऱ्या पुरवठा अधिकाऱ्यांवर व विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री.अनिल देशमुख : (१) होय.

(२) नाही. यासंदर्भात एक तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीची चौकशी केली असता तक्रारीमध्ये तथ्यता आढळून आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

श्री. प्रविण पोटे पाटील : सभापती महोदय, शिराळाच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. परंतु अमरावती जिल्हयातील स्वस्त धान्याच्या संदर्भात खूप तक्रारी आहेत. यासंदर्भात आम्ही जेव्हा स्वस्त धान्य मालकांशी चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, स्वस्त धान्याचा पुरवठा ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने केला जात नाही. तसेच लोकांच्या धान्याबद्दल, गॅसबद्दल, रॉकेल बद्दल तक्रारी असतात. त्यामुळे स्वस्त धान्य पुरवठयाच्या संदर्भात जे अधिकारी काम करतात त्यांना स्वस्त धान्याचा पुरवठा योग्य पध्दतीने उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात काही आदेश दिले जातील काय, तसेच संबंधित एजन्सीवर काही कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सदर प्रश्न हा अमरावती जिल्हयातील शिराळा गावाचा आहे. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी शिराळयाच्या संदर्भातील प्रश्न विचारला नसून त्यांनी इतर भागाचा प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यांसदर्भात त्यांच्या बरोबर अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रश्न निकाली काढला जाईल.

...३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ३७०२३ .....

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय,या ठिकाणी जो प्रश्न विचारला आहे तो प्रातिनिधीक आहे परंतु गेल्या महिन्या भरात संबंध राज्यात कुजलेला गहू आणि तांदळामध्ये सिमेंटची खडी तसेच युरीया असलेला माल स्वस्त धान्यातून उपलब्ध होत आहे. हाच प्रकार अकोला येथे सुध्दा झाला होता. त्या ठिकाणी गव्हाला दुर्गंध येत असल्यामुळे त्या भागातील लोक जमा झाले,यासंदर्भात डीएसओ आणि लोकांची हमरीतुमरी झाल्यानंतर पोलिसांमध्ये तक्रार दाखल करण्यात आल्यानंतर हे सँपल फूड अँड ड्रग विभागाकडे पाठविण्यात आले. ही घटना ३ फेब्रुवारी रोजी घडली होती परंतु ९ फेब्रुवारी रोजी गोदामाला आग लागली गेली. त्यामुळे या सर्व प्रकरणाची त्रयस्त यंत्रणेमार्फत सखोल चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अकोला जिल्हयातील घटना सांगितली आहे परंतु त्यांनी अकोला जिल्हयातील स्पेसिफिक तालुका, गाव याची माहिती दिली तर त्यासंदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. सतिश चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी जी परिस्थिती सांगितली आहे ती परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे. औरंगाबाद येथील बातमी माझ्याकडे असून त्या ठिकाणच्या रेशनच्या गव्हात युरीया व इतर दुर्गंधी अशी बातमी आहे. हा प्रकार एकाच ठिकाणी नाही तर संपूर्ण राज्यात आहे त्यामुळे संपूर्ण राज्याच्या संदर्भात कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, स्वस्त धान्य दुकांना केंद्राच्या एफसीआय कडून पुरवठा केला जात असतो. आपल्याकडे वितरणासाठी जे धान्य येत असते त्यावेळेस त्याची तपासणी करुन ते वितरीत केले जात असते. यासंदर्भात तक्रारी असतील तर मी स्वत: त्यामध्ये लक्ष घालीन. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक गावाची तक्रार सांगितली तर त्यांसदर्भात चौकशी केली जाईल व चौकशी मध्ये जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : हा प्रश्न शिराळा,जिल्हा अमरावती येथील स्वस्त धान्य दुकानातील भ्रष्टाचाराबाबात आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भावना अशी आहे की, वाटपासाठी दिलेल्या गव्हामध्ये अन्य पदार्थ आहेत. ते पदार्थ खाण्यास योग्य नाहीत. त्यामुळे राज्यात सर्व ठिकाणी सूचना देऊन त्यासंबंधातील तपासणी करावी. अत्यंत चांगला गहू देण्याचा प्रयत्न करावा. असे जर झाले तर त्यात काही तरी सुधारणा होईल.

श्री.अनिल देशमुख : होय.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी अकोल्याचे उदाहरण दिले आहे. अकोल्या जिल्ह्यामध्ये वाटपासाठी धान्याचा जो साठा आला होता तो कुजका होता. गव्हामध्ये आणि तांदळामध्ये भेसळ होती. मी वर्तमानपत्राच्या आधारे बोलत नाही. हे खरे आहे की, तेथे जनतेचा असंतोष झाला. मंत्रिमहोदय, सांगतात की, स्पेसिफिक तक्रार द्यावी. त्या गोदामाला लोकांनी नंतर आग लावली. तेव्हा मंत्री महोदय, या सर्व घटनेची चौकशी करणार आहेत काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यासंबंधातील सर्व कागदपत्रे माझ्याकडे द्यावीत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी आपल्या उप प्रश्नामध्ये अकोल्याच्या गोदामासंबंधातील प्रश्न विचारलेला आहे. अकोला येथील गोदाम जाळल्यासंबंधातील तक्रारीसह अन्य देखील तक्रारी आहेत. त्याबाबत आपण सखोल चौकशी करावी अशी माझी सूचना आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ही तक्रार डीएसओ यांच्याकडे आली असेल तर उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांविरूद्ध कारवाई करण्यात येईल. .... (अडथळा).... सभापती महोदय, अकोल्याच्या प्रकरणासंबंधी उच्चस्तरीय अधिकाऱ्या मार्फत चौकशी करण्यात येईल

श्री.पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदय, आपल्याला माननीय सभापतींनी निदेश दिलेले आहेत. त्यानुसार आपण चौकशी करणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांनी येथे दिलेली तक्रार सत्य गृहीत धरून उच्चस्तरीय अधिकऱ्यामार्फत लवकरात लवकर चौकशी करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, स्वस्त धान्याची दुकाने ही गोरगरिबांसाठी आहेत. एफडीआयच्या गोदामातून अत्यंत चांगले धान्य येत असताना ते गरिबांना मिळत नाही. व्यापाऱ्यांच्या विळख्यात ही योजना अडकली आहे. ही योजना पूर्णपणे बरखास्त करून बेरोजगार तरूणांना, महिलांना राबविण्यासाठी द्यावी बेरोजगार तरूणांना किंवा महिलांना मोबाईल व्हॅन पुरवून वस्त्यांवर या गाड्या लावल्या तर गरिबांना धान्य मिळू शकेल. तेव्हा ही जुनी योजना बरखास्त करावी व नवीन उपाय योजण्यासंबंधी शासन विचार करणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये नवीन स्वस्त धान्याची दुकाने देताना महिला बचत गटांचा आपण प्राधान्याने विचार करतो. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांचा प्रश्न मुंबईशी संबंधित आहे. मुंबईमध्ये मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून स्वस्त धान्याचा पुरवठा करण्यासंबंधी आम्ही केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, तक्रार असल्यास द्यावी असे मंत्रिमहोदय सांगत आहे. मी येथे अधिकची माहिती देत आहे. 4 नगरसेवक आणि 100 लोकांनी गोदामावर धाड टाकली होती म्हणून डीएसओने दोन दिवस लेखणी बंद आंदोलन केले होते. या लोकांनी कमीतकमी 200 पोती सडका गहू डीएसओ यांना दाखविला म्हणून डीएसओंनी लोकप्रतिनिधींवर गुन्हा दाखल केला. अधिकाऱ्यांचे म्हणणे होते की, हा एफसीआयकडून माल आलेला आहे. 100 लोकांनी आणि 4 नगरसेवकांनी तक्रार केली म्हणून एसडीओ कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदालन केले आहे. तेव्हा शासन या संपूर्ण घटनेची चौकशी करणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी आधीच सांगितले आहे की, वरिष्ठ अधिकाऱ्या मार्फत चौकशी करण्यात येईल.

.....

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील 2200 रहिवासी हक्कांच्या घरांच्या प्रतीक्षेत असल्याबाबत

(4) * 38225 श्री. विजय गिरकर, ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहरातील 30 ते 35 वर्षे म्हाडाच्या संक्रमण शिबिरातून खितपत पडलेले मास्टर लिस्टवरील 2200 रहिवासी आपल्या कुटुंबासह आजही हक्काच्या घरांच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे जानेवारी, 2013 च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, चाळीच्या जागी इमारती बांधण्यात आल्या परंतु वरील रहिवाशांना अद्याप अशा इमारतीतून हक्काचे घर मिळू शकले नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर रहिवाशांना त्यांचे हक्काचे घर कधीपर्यंत देण्यात येणार आहे,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1),(2),(3) व (4) मुंबई शहरातील उपकर प्राप्त इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशी अनेक वर्षापासून म्हाडाच्या संक्रमण शिबिरात राहत आहेत हे खरे आहे. तथापि, जुन्या उपकर प्राप्त इमारतीतील संक्रमण शिबिरात बऱ्याच कालावधी पासून राहत असलेल्या 1017 भाडेकरु/रहिवाशांना आतापर्यंत प्रारुप बृहतसुचिवर घेण्यात आले असून त्यांचेकडून गाळ्यांच्या वितरणासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. सध्या वितरणासाठी एकूण 339 गाळे उपलब्ध आहेत.

सुधारित विकास नियंत्रण नियमावली 33(7) नुसार विकासक त्याच विभागामध्ये गाळे उपलब्ध करुन देऊ शकतील अशी तरतूद आहे त्यानुसार या विकासकांकडून 13894.47 चौ.मी.इतके अतिरिक्त क्षेत्रफळ उपलब्ध होणार असून सरासरी 300 चौ.फुटाचे 495 गाळे उपलब्ध होतील. तसेच सध्या बांधकाम सुरु असलेल्या पुनर्विकास प्रकल्पातून नजीकच्या काळात विकासकांकडून आणखी अतिरिक्त क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बृहतसुचीवर असलेल्या भाडेकरु/रहिवाशांना कायम स्वरुपी पर्यायी गाळ्यांचे वितरण करणे शक्य होईल. ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासातून सुमारे 13894.47 चौ.मी. अतिरिक्त क्षेत्रफळ हस्तांतरित न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द फौजदारी कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38225 ....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 4 आणि 5 एकाच विषयाचे असल्यामुळे एकत्रितपणे घ्यावे अशी विनंती केली आहे. परंतु या दोन्ही प्रश्नांचे विषय वेगवेगळेत आहेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 4 हा संक्रमण शिबिरा संदर्भातील आहे तर प्रश्न क्रमांक 5 हा देखील संक्रमण शिबिरा संदर्भातील आहे फक्त तो वांद्रे येथील आहे. आपण हे दोन्ही प्रश्न एकत्रित घेतल्यास मला एकत्रितपणे उत्तरे देता येतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 4 हा संक्रमण शिबिरा संदर्भातील आहे तर प्रश्न क्रमांक 5 हा संक्रमण शिबिर आणि एस.आर.ए. संदर्भातील आहे. प्रश्न क्रमांक 4 च्या उत्तराचा उपयोग आम्हाला पाचव्या क्रमांकाच्या प्रश्नासाठी होऊ शकतो हे मंत्री महोदयांना माहीत आहे म्हणून ते दोन्ही प्रश्न एकत्रित घेण्यास सांगत आहेत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मध्य मुंबईतील अनेक जुन्या व मोडकळीस आलेल्या चाळीतील लोक विक्रोळी, सायन आणि कांदिवली येथील संक्रमण शिबिरामध्ये मागील 30-35 वर्षापासून राहत आहेत. या जुन्या चाळींच्या जागी नव्याने इमारती उभ्या राहिल्या, परंतु त्या ठिकाणी मूळ भाडेकरुंना सामावून घेण्यात आलेले नाही. ही बाब अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर मार्च महिन्यापर्यंत त्यांना सामावून घेण्यात येईल असे त्यांनी सांगितल. माझा प्रश्न आहे की, 30-35 वर्षापासून संक्रमण शिबिरामध्ये खितपत पडलेल्या मूळ भाडेकरुंना केव्हा घरे देणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळ हे एकमेव मंडळ खाजगी जमीन त्यापेक्षा खाजगी मालक आणि खाजगी भाडेकरुंच्या संरक्षणाची जबाबदारी घेते. ही गोष्ट खरी आहे की, मुंबई सारख्या शहरामध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींतील भाडेकरुची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरामध्ये करण्यात येते. 20-25 वर्षापासून काही लोक तेथे राहत आहेत. त्यासाठी आपण एक विशेष मोहीम हाती घेतली असून त्या मोहिमेनुसार या लोकांना लवकरात लवकर घरे देणे आवश्यक आहे. आपण मागील वर्षी 351 लोकांची यादी जाहीर केली. 152 लोकांनी अर्ज दिले असून त्यातील 51 लोक पात्र झाले त्यांना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38225 ....

श्री.सचिन अहिर..

घरे दिलेली आहेत. संक्रमण शिबिरामध्ये राहणाऱ्या लोकांची यादी प्रसिध्द केलेली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये 340 लोकांना घरे देण्याची शासनाची तयारी आहे.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, हा एक गंभीर प्रश्न आहे. संक्रमण शिबिरामध्ये राहून मास्टर लिस्टपर्यंत येण्यासाठी लोकांना 15-15 वर्षाचा कालावधी लागतो. मास्टर लिस्टमध्ये आल्यानंतर देखील त्यांचे प्रश्न सुटत नाहीत. कारण एक सदनिका दोन व्यक्तींना दिल्याचे उदाहरण माझ्याकडे आहे. एकाच सदनिकेचे ताबा पत्र आणि देकार पत्र दोन व्यक्तींना देण्यात आली आहेत. ज्याला देकार पत्र मिळाले तो सदनिका ताब्यात घेण्यासाठी गेल्यावर त्या ठिकाणी दुसरीच व्यक्ती राहत असल्याचे त्याला आढळून आले. दुसऱ्या व्यक्तीकडे सुध्दा देकार पत्र आणि ताबा पत्र आहे. शासनाकडून अशाप्रकारची मोठी चूक झालेली आहे. घराचा प्रश्न सोडविण्यासाठी त्याला आणखी चार वर्षे लागली आहेत म्हणजे एकूण 19 वर्षे तो घर मिळण्यापासून वंचित आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, आपण त्यांना घर देणार काय, मुंबईमध्ये अशाप्रकारच्या किती केसेस आहेत, अशाप्रकारची चूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, अधिकाऱ्यांकडून अशाप्रकारची चूक झाली असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी मला स्पेसिफीक केस आणि त्या अधिकाऱ्याचे नाव दिल्यास त्याच्या विरुध्द उचित कारवाई केली जाईल.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, वितरणासाठी एकूण 339 गाळे उपलब्ध आहेत. परंतु मुंबई शहरात अनेक विकासकांनी हे गाळे स्वत:च्या ताब्यात ठेवले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.38225....

श्री.विनायक राऊत....

उदाहरण द्यायचे झाल्यास गिरगांवच्या पिंपळवाडी येथे श्रीपती टॉवरमध्ये 137 सदनिका बांधण्यात आल्या. परंतु विकासकाने त्या सरकारकडे न देता ट्रान्झिट कॅम्प म्हणून वापरल्या आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मूळ सदनिका ताब्यात घेऊन त्या लाभार्थ्यांना तातडीने देण्याची कार्यवाही किती दिवसांत करण्यात येईल काय ?

श्री.सचिन अहिर : महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सदरहू कार्यवाही पूर्ण झाली आहे. 134 गाळे शासनाने ताब्यात घेतले आहेत.

श्री.किरण पावसकर : महोदय, गोरेगाव येथील सिध्दार्थ नगर संक्रमण शिबिरात 80 गाळे आहेत. त्या ठिकाणी 30-32 कुटुंबे राहतात आणि 13 गाळ्यांमध्ये म्हाडाचे कर्मचारी राहतात. उर्वरित सर्व गाळे दलालांच्या हातात आहेत. कफ परेड येथील संक्रमण शिबिरामध्ये सुध्दा दलालांचा खुलेआम सुळसुळाट सुरु आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात अशा प्रकारे अनधिकृत लोक संक्रमण शिबिरामध्ये राहत असल्याचे मान्य केले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, किती लोक संक्रमण शिबिरात राहत आहेत हे सांगण्याऐवजी त्या लोकांना किती दिवसांत बाहेर काढणार आहात ? तसेच म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना संक्रमण शिबिरातील जे गाळे देण्यात येत आहेत ते देण्याची पध्दत बंद करण्यात येईल काय ?

श्री.सचिन अहिर : महोदय, अशा प्रकारची पाहणी करण्यासाठी मास टास्क फोर्स तयार केला होता. म्हाडाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या बाबत 6 महिन्यांचा कार्यक्रम निश्चित केला आहे. येत्या 6 महिन्यात याबाबत कार्यवाही करुन ती माहिती पटलावर ठेवली जाईल. तसेच निश्चितपणे या पुढील काळात म्हाडा कर्मचाऱ्यांना ट्रान्झिट कॅम्पमधील खोल्या दिल्या जाणार नाहीत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी मुंबईतील प्रभूदास नर्सिंगदास बिल्डींग, नारळवाडीसमोर, घोडपदेव येथे राहत होतो. 1982 मध्ये ती इमारत पाडली. 1982 आम्ही सायन-कोळीवाडा, गोरेगाव, कांदिवली अशा विविध संक्रमण शिबिरात राहत आहोत. म्हाडा आणि मालक यांच्या वादामध्ये गेल्या 30 वर्षांत ती इमारत उभी राहिली नाही. मुंबईमध्ये 30 वर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहणाऱ्या लोकांच्या इमारती उभ्या करण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : महोदय, आम्ही प्रॉपर्टी ॲक्वॉयर करण्याचे काम करतो. परंतु काही कारणांमुळे मालक न्यायालयात जातात. म्हणून विलंब होतो. अनेक वेळा फिजिबिलिटी येत नाही किंवा रोड वाईंडींगमुळे हे घडते. अशा सर्व लोकांची मास्टर लिस्ट राज्य सरकारने तयार केली आहे. मास्टर लिस्टमध्ये ते पात्र ठरतील त्या प्रत्येकाना घरे देण्याची राज्य सरकारची भूमिका आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील वांद्रे पश्चिम येथील संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाश्यांना कायमस्वरुपी घरे मिळण्याबाबत.

(५) * ३८०१८ ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वांद्रे (प.) येथील म्हाडाच्या संक्रमण शिबिरात गेली १५ वर्षापासून ३०० हून अधिक कुटुंब वास्तव्य करित आहेत, सदर संक्रमण शिबीरात ५० हून अधिक चाळी असून या शिबिराचा पुनर्विकास करण्यासाठी निविदा काढून त्यास मान्यता मिळाली असून सदर बांधकाम हे संक्रमण शिबीर म्हणूनच बांधण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात या शिबिरात राहणाऱ्या रहिवाशांनी याच ठिकाणी कायमस्वरुपी घर मिळावे यासाठी शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे, यासदंर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(३) तसेच, वर्षानुवर्षे येथे राहणाऱ्या रहिवाशांना त्याच ठिकाणी घरे मिळावीत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) सध्या अस्तित्वात असलेले संक्रमण शिबीर गाळे असलेल्या चाळी तोडून त्या ठिकाणी २०० संक्रमण शिबीर गाळे व ५५० गाळे पात्र झोपडीधारकांसाठी पुनर्वसन गाळयांची इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(२), (३) होय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे याबाबत पत्रव्यवहार केला असल्याचे दिसते. सदर संक्रमण शिबिराच्या संयुक्त पुनर्विकासाच्या प्रस्तावामध्ये संक्रमण शिबिरातील घरे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या लोकांना कायमस्वरुपी देण्याबाबत तरतूद नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.आशिष शेलार : महोदय, हा प्रश्न वांद्रे (पश्चिम) येथील संक्रमण शिबिराच्या रिडेव्हलपमेंट संदर्भातील आहे. बऱ्याच लोकांना घरे देण्यासाठी मास्टर लिस्ट तयार केल्याचे माननीय मंत्री महोदयांनी अगोदरच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे. संक्रमण शिबिराच्या रिडेव्हलपमेंट बरोबरच संक्रमण शिबिराच्या जागेमध्ये असलेल्या स्लमचे सुध्दा रि-डेव्हलपमेंट या टेंडरमध्ये आहे. 2005-06 मध्ये टेंडर होऊन अजूनपर्यंत एकही वीट लागली नाही. स्लमच्या प्रोटेक्शनमुळे 1995 नंतरच्या लोकांना त्याच ठिकाणी घरे मिळणार आहेत. परंतु मूळ मुंबईकर 30-35 वर्षे आपले घर सोडून ज्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये आले त्यांना त्याच ठिकाणी कायमस्वरुपी घरे देण्यात येतील काय ? अशा ट्रान्झिट कॅम्पच्या रिडेव्हलपमेंटमध्ये त्याच ठिकाणी घरे देण्याची धोरणात्मक भूमिका कुलाबा आणि ओशिवरा येथे घेतली आहे तीच भूमिका वांद्रे (पश्चिम) येथील संक्रमण शिबिरात राहणाऱ्या लोकांच्या बाबतीत घेण्यात येईल काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : महोदय, हे खरे आहे की, दोन-तीन प्रकरणात असा निर्णय घेतला आहे. परंतु या ठिकाणी जॉईंट व्हेंचर करीत असताना तशी भूमिका नव्हती. आजच या प्रश्नी ब्रिफींग घेत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सुस्पष्ट सांगितले की, एकाला एक आणि दुसऱ्याला एक न्याय देता कामा नये. प्राधिकरणाने सरसकट या संदर्भात एकच भूमिका ठरवली पाहिजे असेही त्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, वांद्रे (पश्चिम) येथील संक्रमण शिबिरातील किती लोक पात्र आहेत ? मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी नेमके किती लोक पात्र आहेत या बाबतचा सर्व्हे करण्यासाठी तेथे गेल्यानंतर त्या लोकांकडून विरोध होतो. त्यामुळे आम्ही आता पोलीस प्रोटेक्शन घेऊन सर्व्हे करण्याची भूमिका घेतली आहे. त्यानंतर पात्रता यादी तयार करण्यात येईल. पात्रता यादी तयार झाल्यानंतर त्या लोकांना त्याच जागेवर घर देता येईल काय हे पाहता येईल. झोपडपट्टीमध्ये लोक पात्र ठरल्यानंतर त्यांना घरे देण्याची शासनाची भूमिका आहे. जे मूळ भाडेकरु असतील त्यांना यापासून वंचित ठेवण्याची भूमिका नाही. परंतु ते लाभार्थी किती आहेत या बाबतची यादी जोपर्यंत निश्चित होत नाही तो पर्यंत हे स्पष्ट होणार नाही.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38018 .....

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा स्पेसिफिक प्रश्न आहे. टान्झीट कॅम्प कसे दिले असतील ? यामध्ये सरळ हिशेब आहे की, त्या ठिकाणी जे विस्थापित झाले असतील तेवढ्यांनाच ट्रान्झीट कॅम्प दिले असतील. या प्रकरणामध्ये माझ्या माहितीप्रमाणे जवळपास 315 एवढी संख्या आहे. दोन योजना अशा झाल्या की, ट्रान्झीट कॅम्पच्या लोकांना त्याच ठिकाणी घरे देण्यात आली. या बाबतीमध्ये सुध्दा त्यांचा जरी मध्य मुंबईमध्ये क्लेम असला तरी ते क्लेम सोडण्यास तयार आहेत. ही सर्व मराठी माणसे आहेत. ते क्लेम सोडण्यास तयार आहेत. या ठिकाणी त्यांना आपण घर देणार का ? म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो. 1995 सालच्या कायद्यामुळे ज्यांनी झोपड्या बांधल्या त्यांना घरे मिळाली आणि ही जी माणसे आहेत ज्यांना घरे मिळावयास पाहिजे त्यांना घरे मिळालेली नाहीत. म्हणून शासनाने यापूर्वी ज्या दोन योजना केल्या त्यामध्ये ट्रान्झीट कॅम्पच्या लोकांना घरे देण्यात आली तशाच धर्तीवर यांना सुध्दा तत्काळ घरे देणार का ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या ठिकाणी 750 गाळे तयार होणार आहेत. त्यापैकी 200 गाळे संक्रमण शिबीर म्हणून घेणार आहोत आणि 550 गाळे झोपडपट्टीतील लोकांना देणार आहोत. शासनाने निर्णय घेतल्यानंतर आपल्याला पात्रता ठरवावी लागेल. झोपडपट्टीची पात्रता ठरविली म्हणून 550 ही संख्या आयडेंटिफाय झाली. जे 400 लोक आता ट्रान्झीट कॅम्पमध्ये राहतात त्यांची पात्रता ठरवावयास पाहिजे. त्यांची पात्रता झलेली नाही. या संक्रमण शिबीरातील फक्त 51 पात्र भाडेकरुंची यादी झाली. नंतर लोकांमध्ये प्रचंड विरोध झाला म्हणून ती पात्रता होऊ शकली नाही. जर पात्रता झाली आणि आपल्याकडे जे गाळे उपलब्ध आहेत तेवढे पात्र लोक जर त्या ठिकाणी असतील तर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी मंत्री महोदय म्हणाले की, आम्ही प्राधिकरणाला सांगितले आहे की, एका ठिकाणी एक न्याय आणि दुसऱ्या ठिकाणी दुसरा न्याय देता कामा नये. हे सरकार आहे. सरकारने या ठिकाणी घोषित केले पाहिजे की, असा वेगवेगळा न्याय असणार नाही, यापुढे एकच न्याय असेल. मंत्री महोदय असे म्हणाले की, आम्ही त्यांना सांगितले. ते कोण आहेत ? आपण सरकार आहात. दोघांनाही समान न्याय लावण्यात येईल असे आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38018..... श्री. विनोद तावडे .....

घोषित करावे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार त्या ठिकाणी राहतात. त्या ठिकाणी सर्व्हे झाला. या विषयामध्ये दोनदा फॉर्म सबमिट झालेले आहेत. हे फॉर्म सबमिट झाल्यानंतर त्यांनी कागदोपत्री तपासणी करावयाची आहे. ते जाणीवपूर्वक टाळले जात आहे असे मला वाटते. हे जर सबमिट झाले असतील तर किती दिवसात त्यांना मान्यता देणार ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, महिनाभरात देण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, खासकरुन विक्रोळी, टागोरनगर, कन्नमवारनगर आणि मुलुंडमध्ये हाऊसिंग बोर्डाचे टान्झीट कॅम्प आहेत. त्या ठिकाणी अधिकृत अलॉटमेंट केलेले लोक राहात आहेत परंतु त्याच्या व्यतिरिक्त हाऊसिंग बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी ज्या लोकांना त्या ठिकाणी घरे दिलेली आहेत आणि 1986 सालापासून भाडे वसूल करीत आहेत त्या लोकांसाठी शासन काय करणार आहे ? तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर संक्रमण शिबिराच्या संयुक्त पुनर्विकासाच्या प्रस्तावामध्ये संक्रमण शिबिरातील घरे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या लोकांना कायमस्वरुपी देण्याबाबत तरतूद नाही." अधिकाऱ्यांनी संगनमत करुन ज्या लोकांना घरे दिली, ज्या गरजू लोकांना घरे दिली त्यांच्याकडून भाडे वसूल केले जाते. त्यांच्याकडून पाण्याचा टॅक्स वसूल केला जातो. 1995 च्या झोपडपट्टीतील लोकांना घरे देणार आहोत मग यांना यापासून बाधित का करता ? त्यांना घर देणार आहात की नाही ? त्यांना घर द्यावे अशी मी मागणी करते.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, देता येत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, यामध्ये थोडा वेगळा प्रश्न आहे. हे जे ट्रान्झीट कॅम्पमध्ये 30-30 वर्षे उपकरप्राप्त इमारतींचे अनेक रहिवाशी या मुंबई शहरातील राहात आहेत. त्याची कारणे अशी आहेत की त्यांच्या इमारती त्या जागेमध्ये तयार होत नाहीत. कारण अनेक प्लॉट फार अरुंद आहेत. मुंबई शहरातील अशा किती प्लॉट्समधील इमारती पडलेल्या आहेत की ज्या आपण संपादित केल्या नाहीत आणि त्यांचा एफएसआय तसाच पेंडींग आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38018..... श्री.प्रकाश बिनसाळे....

या सर्व प्लॉटचा सर्व्हे करुन भू-संपादनाची प्रक्रिया करुन त्याच्यावर वेगळी योजना करुन नवीन घर बांधणीचा कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सजेशन फॉर ॲक्शन.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ KTG/ ST/

पुणे शहरामध्ये भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारणे व महात्मा फुले स्मारकाचा विस्तार करण्याबाबत

(6) * 38164 श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरामध्ये फुले दांपत्याने मुलींची पहिली शाळा सुरु केलेल्या भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारण्याची कार्यवाही तातडीने करण्याची तसेच महात्मा फुले यांच्या स्मारकाचा विस्तार करण्याची मागणी माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच पुणे महापालिकेच्या आवारातील महात्मा फुले स्मारक आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक ही दोन्ही स्मारके जोडून दोन्ही स्मारकाच्या परिसराचा विकास तसेच सुशोभिकरणाचे काम अद्यापही अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मध्ये नमूद केलेल्या स्मारकाच्या विस्तारासाठी अतिरिक्त जागा संपादित करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) असल्यास, सदर कामाला किती कोटी खर्च अपेक्षित आहे, व उक्त काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(5) उक्तप्रकरणी अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) हे खरे आहे.

(2) दोन्ही स्मारके जोडण्यासाठी बाधीत मिळकतीच्या भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून, भूसंपादन पूर्ण झाले नसल्याने सुशोभिकरणाचे काम सुरु झालेले नाही.

(3) पुणे पेठ बुधवार सिटी सर्व्हे क्र. 257 क / 1, 257 क/2 येथील भिडेवाडा प्रथम मुलीची शाळा या राष्ट्रीय स्मारकासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. तसेच महात्मा फुले स्मारकाभोवतालची भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून, भूसंपादनासाठी संयुक्त योजना पूर्ण झालेली आहे. या प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दावा दाखल असल्यामुळे प्रकरण न्यायाप्रविष्ठ आहे.

(4) भिडेवाडा प्रथम मुलीची शाळा या स्मारकासाठी भूसंपादनासाठी रु.1,30,50,058/- इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच महात्मा फुले पेठ येथील स्मारकासाठी आवश्यक रक्कमेचा तपशील अद्याप विशेष भूमि संपादन अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, शासनाने ठरलेल्या वेळेत स्मारक का उभे केले नाही, 9 वर्ष झालेले असल्यामुळे ते केव्हा निर्माण केले जाणार आहे, स्थानिक राहिवासी आपल्या जमिनी या स्मारकासाठी देण्यास तयार असताना शासन त्या जमिनी का घेत नाही ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38164....

श्री.भास्कर जाधव : या प्रश्नामध्ये दोन विषय एकत्रित केलेले आहेत. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दोघांची स्मारके एकत्रित करण्यासंबंधी प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्या जागेवर एकूण 63 मिळकती, 203 भाडेकरु आणि 44 झोपडपट्टया आहेत. त्या जागेवरील लोक जागा देण्यास तयार आहेत अशी वस्तुस्थिती नाही. ते लोक स्वत:हून जागा रिकामी करण्यास तयार नाहीत. म्हणून ती जागा संपादित करण्यासाठी क्र.4 ची नोटीस इश्यू केलेली आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : मी पुणे महानगरपालिकेची 9 वर्षापूर्वी महापौर असताना पुढाकार घेतल्यामुळे या स्मारकाची सुरुवात झाली होती. परंतु महापौर बदलले की, प्रायॉरिटीज बदलत असतात. त्यामुळे त्या स्मारकासाठी दरवर्षी बजेटमध्ये तरतूद न केल्यामुळे ते स्मारक रखडलेले आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकामध्ये फक्त 500 मीटरचे अंतर आहे. ही स्मारके एकमेकाला जोडण्याचा हा प्रश्न आहे. परंतु त्या जागेवरील नागरिकांच्या स्थलांतराचा प्रश्न निर्माण झालेला आहे. पुणे महानगरपालिकेचे काही प्रश्न प्रलंबित असल्यामुळे ते सोडविण्यासाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय, फुले दांपत्य असे प्रश्नामध्ये छापलेले आहे, त्याला माझा विरोध आहे. त्याबाबत मी खेद व्यक्त करीत आहे. कारण ते आमचे मोठे दैवत आहे. त्याऐवजी क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले असा त्यांचा उल्लेख केला पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या स्मारकासाठी निधीची अडचण नाही. कारण पुणे महानगरपालिका स्वत:हून या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. भिडेवाडा प्रथम मुलीची शाळा या स्मारकाच्या भूसंपादनासाठी पुणे महानगरपालिकेने 1.30 कोटी रुपये त्यांनी भरलेले आहेत. आज सकाळी मी महानगरपालिकेकडे विचारणा केलेली आहे. या स्मारकासाठी संयुक्त मोजणी होणार आहे. नियमानुसार काही आगाऊ रक्कम भरावी लागते. ती रक्कम भरण्यासाठी पैशाची अडचण नाही. त्या जागेवर 63 कुटुंबे आहेत. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी वेगवेगळ्या फ्लॅटची सोय केलेली आहे. परंतु ते त्या ठिकाणी जाण्यास तयार नाहीत ही खरी अडचण आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38164....

डॉ.नीलम गोऱ्हे : मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, या स्मारकासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. परंतु ही प्रक्रिया किती वर्षापूर्वी सुरु झाली, सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी असे सांगितले की, दोघांचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. परंतु प्रश्न क्र.2 मध्ये या दोघांचा स्वतंत्र उल्लेख आलेला आहे. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "आवश्यक रकमेचा तपशील विशेष भूमी संपादन अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला नाही." कोर्टात दावा असल्यामुळे हा तपशील उपलब्ध झाला नाही की तरतूदच करण्यात आलेली नाही ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : संयुक्त मोजणी कधी केली असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. महापालिका आणि जिल्हाधिका-यांमार्फत भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक 3.7.2012ला संयुक्त मोजणी केली. या मोजणी नुसार महापालिकेला ॲडव्हान्स किती रक्कम भरली पाहिजे यासंबंधीचा अहवाल आलेला नाही. तो अहवाल आल्यानंतर रक्कम भरली जाईल.

श्री. हेमंत टकले : ज्या दोन महानुभावांच्या नावाची स्मारके आहेत त्यासाठी शासनाच्या ताब्यात किती जागा आहे, ती जागा हेरिटेज म्हणून जतन करावयाची असेल तर त्यासाठी किती खर्च येईल ? सर्वांची संमती असेल तर विस्तारित एकत्रित स्मारक प्रशस्त जागेमध्ये करण्याचा शासन विचार करील काय ?

श्री. भास्कर जाधव : एकंदरीत ही जागा 3008 चौ. मीटर आहे. हे स्मारक एकत्रितपणे करायचे झाले तर अंदाजे किती खर्च येईल असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. जागा ताब्यात न आल्यामुळे कोणकोणती कामे करावयाची हे निश्चित करता येत नाही. त्यामुळे आता अंदाजित किती खर्च येईल हे सांगता येत नाही.

श्री. दिप्ती चवधरी : हे तीन वेगवेगळे प्रश्न आहेत. हे तीन प्रश्न एकत्र केल्यामुळे गोंधळ निर्माण झालेला आहे असे मला वाटते. महात्मा फुले स्मारकासंबंधीचा हा प्रश्न नाही. ती जागा पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे. सावित्रीबाई फुले स्मारकासंबंधी मी वारंवार निधीची मागणी केलेली आहे. दोन्ही स्मारकांना जोडणा-या रस्त्याचा प्रश्न आहे. त्यासाठी सुध्दा मी निधीची वारंवार मागणी केलेली आहे. या स्मारकाच्या बाबतीत मला माननीय मुख्यमंत्र्यांकडून आश्वासन पाहिजे. कारण गेल्या 10 वर्षापासून सावित्रीबाई फुलेंच्या स्मारकाचे काम रखडलेले आहे. हे स्मारक असेच दुर्लक्षित ठेवले जाणार आहे काय ? माननीय मुख्यमंत्री या प्रकरणी लक्ष घालून स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन देतील काय ?

श्री. भास्कर जाधव : हे वेगवेगळे विषय असल्याचे आमच्या लक्षात आलेले आहे. भिडे वाड्याचा विषय वेगळा आहे. दुसरा विषय महात्मा जोतिबा फुले स्मारकासंबंधीचा आहे. भिडे वाडा हा बुधवार पेठेत आहे. महात्मा जोतिबा फुले स्मारक हे भवानी पेठ या ठिकाणी आहे. भिडेवाडा ताब्यात घेऊन तेथे स्मारक उभे करणे असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. याबाबतीत मी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले की, भिडे वाडयाची जागा ताब्यात घेण्यासंबंधी 4.1.2008ला स्थायी समितीमध्ये प्रस्ताव पारित केलेला आहे. पुरातत्व विभागाच्या बैठकीत देखील त्याला पुरातन वास्तूचा दर्जा दिलेला आहे. त्या ठिकाणी 8 व्यापारी गाळे आहेत, 7 भाडेकरु आहेत. ही जागा पुणे मर्चण्ट बँकेच्या ताब्यात असून हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. भूसंपादनाची रक्कम रु. 1,30,50,058/- इतकी आहे. ही रक्कम महानगरपालिकेने भरलेली आहे. येथे निधीचा प्रश्न उपस्थित होत नाही. हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत याची मला कल्पना आहे. महानगरपालिकेने अपेक्षित सहभाग घेतला नाही तर सन्माननीय सदस्यांची तळमळ बघून शासन योग्यवेळी या प्रकरणी हस्तक्षेप करील.

...नंतर श्री. गिते..

.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाबद्दल शासनाला निश्चितपणे आदर आहे. यासंबधी व्यवस्थित प्रस्ताव आले व जमीन अधिग्रहणाचे प्रश्न सुटले तर सदर स्मारकांच्या बांधकामासाठी निधीची अजिबात कमतरता पडणार नाही. मी या सभागृहाला अधिक माहिती देऊ इच्छितो, ती माहिती या प्रश्नाच्या उत्तरामध्ये आली नाही. महात्मा फुले यांच्या वारसांना नोकरी देण्याचा प्रश्न हा शासनाच्या समोर प्रलंबित होता. शासनाने या बाबतीत सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री मी आणि या प्रश्नाच्या संदर्भात वेगवेगळया बैठका घेतल्या होत्या. मला या सभागृहाला सांगण्यास आनंद होतो की, महात्मा फुले यांच्या दोन वारसांना शासकीय नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. श्री.कुणाल होले यांना शासकीय वसतीगृह, कोरेगाव, पुणे येथे दिनांक 2 मार्च, 2013 रोजी नियुक्तीचे आदेश देण्यात आले होते, त्या दिवशी ते कामावर हजर झालेले आहेत, त्याचबरोबर श्री.विशाल होले यांना समाजकल्याण आयुक्तालयामध्ये दिनांक 2 मार्च, 2013 रोजी नियुक्तीचे आदेश दिले होते, ते देखील त्याच दिवशी कामावर हजर झाले आहेत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना अपघाती विमा योजना लागू करण्याबाबत

(७) * ३७७९९ श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.संजय दत्त, श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात एक लाख सात हजार कर्मचारी कार्यरत असून त्यामध्ये ३३ हजार चालक आणि ३२ हजार वाहक असून अद्यापपर्यंत महामंडळाने अपघाती विमा योजना लागू केली नसल्याचे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने महामंडळातील चालक व वाहकासह एक लाख कर्मचाऱ्यांना अपघाती विमा योजना लागू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व किती कालावधीत विमा योजना लागू करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ लागू आहे. सदर कायद्यातील तरतुदीनुसार कामगिरीवर असताना अपघातामध्ये जखमी झाल्यास किंवा मृत पावल्यास नुकसान भरपाई दिली जाते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम १९२३ मधील तरतूदी व्यतिरिक्त सेवेत असताना कर्मचारी मृत पावल्यास वारसाना ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत १५ महिन्याच्या वेतना एवढे अतिरिक्त उपदान अदा केले जाते. मृत कर्मचाऱ्यांच्या वारसास त्यास अनुज्ञेय असलेल्या उपदान, भविष्य निर्वाह निधी व्यतीरिक्त रुपये एक लाखाचे अर्थसहाय्य कुटुंब कल्याण सहाय्य योजनेखाली दिले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात दुरुस्ती करु इच्छितो. अनुक्रमांक ३ च्या उत्तरातील ओळ क्रमांक २ मध्ये " १५ महिन्याच्या वेतना एवढे" या ऐवजी " १० महिन्यांच्या वेतन एवढे" असे वाचावे. उर्वरित उत्तर छापल्याप्रमाणे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, एस.टी.महामंडळामध्ये १ लाखापेक्षा जास्त कर्मचारी काम करतात. एस.टी.च्या बसेसमधून दररोज ६५ लाख प्रवासी प्रवास करीत असतात. महामंडळामध्ये ३३ हजार चालक आहेत. ३२ हजार वाहक आहेत हे दररोज प्रवाशांना घेऊन प्रवास करीत असतात. एस.टी.बसेसचे अनेक वेळेला अपघात होतात. अनेक वेळा अतिश्रमामुळे चालक किंवा वाहक यांचा कामावर असताना मृत्यू होतो. एस.टी.महामंडळातील कर्मचारी कामावर मृत्यू पावला तर त्याचा अंत्यसंस्कार करण्यासाठी २ हजार रुपये देण्यात येतात. अत्यंसंस्कार २ हजार रुपयात होतो अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. एस.टी.महामंडळातील कर्मचाऱ्यांना एस.टी.महामंडळाच्या निधीतून एक रुपयाची देखील आर्थिक मदत दिली जात नाही. प्रत्येक महिन्यात कर्मचाऱ्यांच्या वेतनातून ४० रुपये कपात करुन घेण्यात येते. कर्मचारी मृत पावला तर त्यांच्या कुटुंबीयांना १ लाख रुपये दिले जातात. एस.टी.महामंडळाकडे १० कोटी रुपये कर्मचाऱ्यांच्या मालकीचे जमा आहेत. या पैशात एस.टी.महामंडळाचा एक पैसा सुध्दा नाही. ते १० कोटी रुपये बँकेत डिपॉझीट म्हणून ठेवले तर त्या डिपॉझीटवरील व्याजाच्या रकमेत महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांचा विमा उतरविला जाऊ शकतो. प्रत्येक महिन्याला कर्मचाऱ्याच्या वेतनातून ४० रुपये कापले जातात, त्या पैशांचे बँकेत स्वतंत्रपणे अकाऊंट उघडले आहे काय, सदर डिपॉझीट रकमेच्या व्याजावर कर्मचाऱ्यांकरिता काही योजना आहे काय ? सदरहू व्याजाच्या रक्कमेतून कर्मचाऱ्यांचा विमा उतरविला जाईल काय ?

श्री.गुलाबराव देवकर : एस.टी.महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा ४० रुपये वर्गणी कापली जाते, ती वर्गणी एकत्रित जमा होते, त्यामध्ये दर वर्षी महामंडळाचे अंशदान १.५० कोटी रुपये टाकतो. साधारणत: ६.३० कोटी रुपये जमा होतात. त्या रक्कमेतून मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना १ लाख रुपये दिले जातात. सन्माननीय सदस्यांनी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा विमा काढला जाईल काय अशा प्रकारचा प्रश्न विचारलेला आहे. एस.टी.महामंडळातील कर्मचारी मृत

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

झाल्यानंतर महामंडळाकडून दोन, तीन प्रकारच्या व्यवस्था केलेल्या आहेत. कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर १९२३ च्या अधिनियमातील कलम ३ व ४ मध्ये १.२० लाख रुपयांची भरपाई देणे अनिवार्य असल्याची तरतूद केलेली आहे. कर्मचाऱ्याच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कमेवर गुणांक दिलेला असतो, त्याचा गुणाकार करुन जी काही रक्कम होते तेवढी नुकसान भरपाईची रक्कम म्हणून दिली जाते. मृत कर्मचाऱ्याच्या वयानुसार नुकसान भरपाई दिली जाते. उदाहरण द्यावयाचे झाले तर मृत कर्मचाऱ्याचे वय २५ वर्ष असेल, त्याला जवळपास ७ लाख ५९ हजार रुपये नुकसान भरपाई मिळते...

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साधारणत: सरासरी 55 वर्षाचे वय असेल तर 5.42 लाख रुपये पहिल्या टप्प्यामध्ये या नियमानुसार मिळतील. दुसरा भाग आहे, त्यातून मी सांगितल्याप्रमाणे 1 लाख रुपये मिळतील आणि अंतिम संस्कारासाठी 5 हजार रुपये तातडीने देण्याची व्यवस्था करीत असतो. अधिनियम, 23 नुसार भरपाईची रक्कम 30 दिवसाच्या आत देणे अनिवार्य आहे. अशा प्रकारच्या ज्या काही व्यवस्था केलेल्या आहेत त्यातून मृत व्यक्तीच्या वारसांना साधारणत: रुपये 5 लाखापासून 12 लाखापर्यंत रक्कम देण्याची व्यवस्था या सर्व नियमानुसार केलेली आहे. त्यामुळे वेगळ्या प्रकारचा विमा काढण्याची आवश्यकता नाही, अशा पध्दतीचे धोरण आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

सभापती : आता माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे औचित्याचा मुद्दा मांडतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण अनुमती दिली म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा सभागृहासमोर मांडतो.

सभापती महोदय, दिनांक 20 मार्च हा जागतिक चिमणी दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरातील चिमण्यांच्या प्रजाती, घराजवळ आढळणाऱ्या चिमण्यांच्या संवर्धनासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. दिवसेंदिवस कमी होत जाणारी चिमण्यांची संख्या अस्वस्थ करणारी आहे. या अगोदरच पर्यावरणाच्या संतुलनासाठी वने, पशु-पक्षी यांचे जतन व संवर्धन आवश्यक झाले आहे. व्यापक जनजागरणाची मोहीम वन व पर्यावरण विभागाने संयुक्तपणे हाती घ्यायला हवी. खरे म्हणजे आपल्या शिक्षणाची सुरुवातच चिमणी कावळ्यांच्या गोष्टींनी होते. निसर्गाने मानवाला दिलेले वरदान म्हणजे हे पशु-पक्षी धन आहे. वेळीच आपण जागे होऊन 'या चिमण्यांनो परत फिरा रे' असा आग्रह धरला पाहिजे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 2011 या आदेशातील नियम 7 अन्वये वार्षिक योजना 2013-14 करिता नियतव्ययाच्या मंडळनिहाय संवितरणाकरिता माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

.4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज दुपारी 2.00 वाजता सन 2013-2014 चा अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. तत्पूर्वी सभागृहामध्ये अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने जी मांडणी करावयाची असते त्या दृष्टीकोनातून मी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे. दुपारी 2.00 वाजता अर्थसंकल्प मांडण्यात येईल. आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना व अन्य कामकाज पूर्ण करण्यासाठी गुरुवार किंवा शुक्रवार या दिवशी सकाळी एक तासाकरिता विशेष बैठक घेण्याची व्यवस्था करण्यात येईल, जेणेकरुन शिल्लक राहिलेले कामकाज पूर्ण करता येईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.19 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: सन 2013-2014 चा अर्थसंकल्प सादर करणे

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी सन 2013-2014 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

या नभाने, या भुईला, दान द्यावे,
आणि या मातीतून चैतन्य गावे,
कोणती पुण्ये अशी येती फळाला,
जोंधळयाला चांदणे लगडून जावे.

(प्रेस : येथे माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे भाषण छापावे)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन 2013-2014 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर झाला आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 21 मार्च, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 9 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 21 मार्च, 2013 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही